

श्री साईबाबा संस्थान शिरडीकी अधिकृत पत्रिका

# श्री साईलीला


**अमृत महोत्सवी वर्ष**

जुलै-ऑगस्ट १९९
(गुरुपौर्णिमा विशेषांव

संपादक : द. म. सुकथनकर
कार्यकारी संपादक : विद्याधर ताठे


मूल्य ८ रु.

॥ कृष्णम् वन्दें जगद्गुरुम् ॥






१ मे १९९७, महाराष्ट्र दिनानिमित्त 'अहमदनगर' जिल्ह्यासाठी श्री साईबाबा संस्थान, शिरडीने तयार केलेल्या चित्ररथाची
(कला, कल्पना : विलास महाडिक)



श्री साईबाबा संस्थान शिरडीचे
अधिकृत नियतकालिक

# श्री साईलीला

वर्ष ७५ अंक ५-६

जुलै - ऑगस्ट १९९७

: संपादक :

**द. म. सुकथनकर**

: कार्यकारी संपादक :

**विद्याधर ताठे**

**: कार्यालय :**

'साईनिकेतन',
८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी. : ४१६ ६५ ५६
फॅक्स : (०२२) ४१५ ०७९८

: मुद्रक :
**गीता ऑफसेट, मुंबई.**

: टाईपसेटींग :
**देवयानी एन्टरप्रायझेस, मुंबई.**

वार्षिक वर्गणी : रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी : रु. १०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी :
रु. १०००/-
(टपाल खर्चासहित)
अंकाची किंमत : रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान शिरडी यांनी हे नियकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - १४ येथे छापून प्रसिद्ध केले.

या नियतकालिकातील लेखात प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मताशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# अमृतमहोत्सवी वर्ष
(१९९७-९८)



वसुदेव सुतम् देवम्
कंसचाणूरमर्दनम् ।
देवकीपरमानन्दम्
**कृष्णम् वन्दे जगद्गुरूम् ॥**

## अंतरंग


| | |
|---|---|
| **संपादकीय** : विद्याधर ताठे | २ |
| **साईबाबांचे 'भागवत' प्रेम** : गो. रा. दाभोळकर उर्फ हेमाडपंत | ३ |
| **संतकवि दासगणू विरचित साईभक्ती गुरूपाठाचे अभंग** : | ५ |
| **कृष्णं वंदे जगद्गुरू** : डॉ. गुणवंत शहा | ९ |
| **हेमाडपंत विचरित गुरूमहात्म्य** : | १७ |
| **श्रीकृष्ण भगवंतांचा पूर्णावतार** : स्वामी वरदानंद भारती | १८ |
| **कृष्णलीलाचे शब्दरूप दर्शन नाथ भागवत** : के. वि. बेलसरे | २२ |
| **श्रीमद् भगवद्गीता श्रीकृष्णाची वाङ्मयमूर्ती** : अ. दा. आठवले | २५ |
| **होता पहा माझा गुरु ।...** | २८ |
| **विश्वात्मक माझा स्वामी निवृत्तीराजा** : डॉ. ग. वा. तगारे | २९ |
| **गीता भागवत । मुख्यतः हेच दोन ग्रंथ** | ३५ |
| **घडीने घडी साधावी !** : डॉ. अशोक प्रभाकर कामत | ३६ |
| **अभिप्राय** : | ४१ |
| **साईबाबांचे गीता प्रवचन** : | ४२ |
| **धर्मदर्शन: एक दीपस्तंभ** : | ४५ |
| **विदेशी चिंतकांची प्रचिती** : | ४६ |
| **ग्रंथसूची** : | ४७ |
| **आवाहन** : | ४८ |

# संपादकीय

**विद्याधर ताठे**



**साई सप्रेम करूणाघन । नानांस निमित्ता पुढे करून ।**
**तुम्हा आम्हा सकलांलागून । गीतार्थ प्रवचन हे केले ।।**

श्री साई बाबांनी नानांना भगवद् गीतेच्या ४थ्या अध्यायातील ३४ व्या श्लोकांवर केलेले निरुपण - प्रवचन ऐकून स्वत: नानांनाच आश्चर्याचा धक्का बसला. ते बाबांचे त्रिकाल ज्ञान व संस्कृतावरील प्रभूत्व पाहून स्मिमित झाले. बाबांना बहुतेकजण अडाणी - फकीर समजत होते. कारण बाबांचे यथार्थ रुप समजून घेण्याची दृष्टीच सामान्य साई भक्तांना नव्हती. खरं तर बाबा हे श्रीकृष्णाचेच आधुनिक अवतार होते. तेराव्या शतकात महाराष्ट्रात श्रीकृष्णाने संत ज्ञानदेवाच्या रुपात अवतार घेतला व ज्ञानेश्वरी रुपाने गीतेचा मराठी आविष्कार झाला. त्यानंतर २० व्या शतकात श्रीकृष्णाने साईबाबाच्या रुपात महाराष्ट्रात पुन:श्च अवतार घेतला व कालसापेक्ष अशा मानवधर्माची आपल्या अनंत लीलांद्वारे संस्थापना केली असावी असे मला वाटते, अर्थात असे अनेकांना वाटते, अनेकांनी मला त्याबाबत आपली अनुभूतीही सांगितली आहे.

भगवंताच्या १० अवतारांपैकी श्रीकृष्ण हा ८ वा अवतार असून त्यास 'पूर्णावतार' मानले जाते.

**परित्राणाय साधूनाम् विनाशायच दुष्कृताम्।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभावामी युगे युगे ।।**

हे भगवंतानी भाविक भक्तांना दिलेले अभिवचन असून १० अवतार हे त्या अभिवचनाच्या परिपूर्तीचाच भाग आहेत. भगवंताच्या अवताराची गरज मानवी जीवन आहे तोवर अखंड आहे. त्यामुळे १० अवतारानंतरही भगवंत वेळोवेळी विविध रुपात कालमानसापेक्ष अवतार घेत आहे. **श्रीसाईबाबा** हा त्यापैकीच एक अवतार आहे.

'जुलै-ऑगस्ट' महिन्याच्या या प्रस्तुत अंकात या काळातच येणाऱ्या **गुरुपौर्णिमा उत्सवाचे** निमित्त साधून आम्ही हा अंक **'कृष्णम् वंदे जगद्गुरूम्'** विषयाला प्राधान्य देऊन सिद्ध केलेला आहे. प्रत्येकाचे आपापले गुरु असतातच पण श्रीकृष्णाला सर्वांनीच 'जगद्गुरू' मानलेले आहे. अशा जगद्गुरू श्रीकृष्णाचे स्मरण आपण या अंकात करणार आहोत. त्या दृष्टीने डॉ. गुणवंत शहा, ह. भ. प. अनंतराव आठवले, श्री. के. वि. बेलसरे आदी थोर चिंतकांचे विचार आम्ही या अंकात समाविष्ट केलेले आहेत. तसेच **गीता हे श्रीकृष्णाचे तत्त्वज्ञान** व **भागवद् हे कृष्णलीलांचे दर्शन** आहे हे लक्षात घेऊन आम्ही गीता-भागवत या दोन्ही ग्रंथांचा वाचकांना या अंकात परिचय करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या अनुषंगाने श्री बाबांचे 'भागवत प्रेम' हा १९२८ साली महान **साईभक्त हेमांडपंत** यांनी लिहिलेल्या **'श्री साईलीला'**तील लेखाचे या अंकात **'अमृतकलश'** म्हणून पुनमुर्द्रण केलेले आहे. ही सारी भक्ती सामुग्री वाचकांना आवडेल व तो श्री साईबाबांचे व्यापकत्व समजून घेईल अशी आशा आहे.

पारमार्थिक वाटेवर इतर क्षेत्रापेक्षाही गुरूची गरज सर्वात अधिक आहे. गुरूविना पारमार्थिक अनुभव शक्य नाही. **'गुरुविन कोण दाखविल वाट'** अशा अवस्थेत गुरुच्या शोधात अनेक साधक तळमळत असतात. **'नाही मज भूक ना तहान । गुरुवीण मन अस्वस्थ ।' (साईसच्चरित्र)** साईबाबांना अनेकांनी आपले गुरु मानलेले आहे. साईभक्त दासगणूंचे साईभक्तीपर गुरुपाठाचे अभंग याच दृष्टिने प्रस्तुत अंकात समाविष्ट केलेले आहेत. साई बाबांना ज्या श्रीकृष्णाचे अवतार मानले जाते त्या पूर्णावतार श्रीकृष्णाचे स्मरण हे बाबांचे स्मरण आहे. बाबानी 'सबका मालिक एक' या संदेशाद्वारे सर्व अवतारी महापुरुषातील एकाच ईश्वराचे सर्वांना स्मरण घडविलेले आहे असे मला वाटते.

**विद्याधर ताठे**
कार्यकारी संपादक, श्री साईलीला

अमृतकलश

# साईबाबांचे 'भागवत' प्रेम

गो. रा. दाभोळकर उर्फ
हेमाडपंत
(श्रीसाईसच्चरित्र पोथीचे महान लेखक)

## (श्री साईलीला १९२८ सालच्या अंकातून)



श्री समर्थ साईमहाराज यांचे **एकनाथी भागवत** व **भावार्थ रामायणावर** फार प्रेम असे. ते स्वत: कधी ते ग्रंथ वाचीत किंवा त्याचें परिशीलन किंवा त्यावर प्रवचन करीत असें नाही. पण आपल्या दर्शनास येणारे भक्तांनी हे ग्रंथ वाचावे व आपले नित्यपाठांत ठेवावे व त्यांतील प्रमेये आपले आचरणांत आणावी अशी त्यांची मनापासून फार इच्छा असे. याचा अर्थ इतर प्रसिद्ध संतांचे पारमार्थिक ग्रंथांबद्दल त्यांचा आदर कमी होता असें बिलकूल नाहीं. श्रीमदगवद्गीता, उपनिषदे, ज्ञानेश्वरी, नामदेव-तुकारामादिकांच्या अभंगाच्या गाथा, कृष्णदयार्णवांचा दशमस्कंध, महाभारतांतर्गत विष्णुसहस्त्रनाम इत्यादि ग्रंथांबद्दलही त्यांना तशीच आदरबुद्धि होती.

यांपैकी एकनाथी **भागवत** व **ज्ञानेश्वरी** हे दोन ग्रंथ तर त्यांचे मशिदी नजीकचे साठे साहेबांचे वाड्यांत त्यांचे भक्त कै.सखाराम हरी उर्फ बापूसाहेब जोग यांजकडून प्रत्यही दोन प्रहरी आळीपाळीने वाचवीत व मशीदीत दुपारचे वेळी आपले पादसंवाहन अगर अशाच प्रकारची कोणतीही सेवा करावयास आलेल्या किंवा बसलेल्या कित्येक भक्तांस बाबा पुष्कळदा दक्षिणा मागून आणण्याच्या मिषानें पोथी ऐकण्याकरिता बापूसाहेबांकडे पाठवीत व अशा वेळी बहुधा बापूसाहेब ते ग्रंथ वाचीत असता हे भक्त बापूसाहेबांचे सांगण्यावरून पोथी ऐकण्यास बसत व वाचन संपल्यावर दक्षिणेचा बाबांचा निरोप बापूसाहेबांस देत व जितकी दक्षिणा मागितली असेल तितके आमचे नमस्कार बाबांस सांगा असा बापूसाहेबांचा निरोप घेऊन तासा दोन तासांनी हे भक्त बाबांकडे परत येत व तो निरोप बाबांस सांगत. एकदां कै. हरी सीताराम उर्फ काकासाहेब दीक्षित यांजला बाबांनी त्यांचे वाड्यांत एकसारखे महिने बसवून ठेवल्या वेळी त्यांना भागवताचे दशमस्कंधावरील हरिवरदा नामक मराठी टीकात्मक एक मोठा ग्रंथ आहे तो वाचीत राहण्याची आज्ञा केली. तो वाचून झाल्यावर द्विसा **एकनाथी भागवत** व रात्री **भावार्थ रामायण** वाचण्याची बाबांची आज्ञा झाली व काकासाहेबांनी ती आज्ञा अक्षरश: पाळली. नाथांनी या एकादशस्कंधाच्या टीकात्मक ग्रंथरचनेस पैठणास प्रारंभ केला, पंचाध्यायी तेथेच पुरी केली व पुढील सव्वीस अध्याय श्रीक्षेत्र काशीत लिहिले. शके १४९५ श्रीमुखसंवत्सरांत हा ग्रंथ त्यांनी पूर्ण केला. ग्रंथ असामान्य आहे. नाथांचा एक शिष्य नाथांचे पंचाध्यायीची एक नक्कल घेऊन काशीयात्रेला गेले असता प्रात:काळी भागीरथीचे स्नान करून पंचाध्यायी वाचण्याचा त्यांचा नेम पाहून काशीकर शास्त्र्यांचे नजरेस ही गोष्ट येतांच संस्कृत भागवतावर प्राकृतांत ओव्या करण्याचें नाथांचें धाडस त्यांना खपले नाही. तेणेंकरून संस्कृत भाषेचे पावित्र्य नष्ट करण्याचा नाथानी प्रयत्न करण्याचा त्यांजवर आरोप करून काशीक्षेत्री सभा भरवून त्यांना जाहीर रीतीनें निषेध करून त्यांस दंड करण्याचें ठरून

नाथांस बोलावणे पाठविले. त्या सुमारास नाथमहाराजांचे वय सुमारें २३ वर्षांचे असून गुर्वाज्ञेने नुकताच कोठे गृहस्थाश्रम स्वीकारला होता. हे बोलावणे म्हणजे हा काशीविश्वेश्वराचा प्रसाद असे मानून नाथ काशीस गेले. तेथें ती त्यांचे शांत वृत्ति, त्यांची गुरूभाक्ति, त्यांचे अप्रतिम वक्तृत्व व त्यांचे अतिसरळ प्रेमळ वर्तन पाहून त्यांच्या दर्शनास काशीकरांच्या झुंडीच्या झुंडी येऊ लागल्या काशीकर शास्त्र्यांची व पंडितांची त्यांच्याबद्दलची मते हळू हळू बदलूं लागली. इकडे नाथांचे अध्यायांवर अध्याय पुरे होतां होतां काशीस त्यांच्या भागवताचे २६ अध्याय पुरे होताच सभा भरवून सबंध ग्रंथांची छाननी झाली व नाथांना दंड करण्याचा ठराव होण्याचे बदला भागवताचा एकादशस्कंध नाथांनी मराठी भाषेचे कोंदणांत फार सुंदर रीतीनें जडविल्याबद्दल त्यांची तारीफ होऊन काशीकरशास्त्री पंडितांनी ग्रंथाची पालखीतून मिरवणूक काढली, पूजा केली व नाथांचा जयजयकार केला.

**अशा या लोकोत्तर ग्रंथास श्री साईबाबा हे एकनाथाची वृंदावनाची पोथी म्हणत.** कृष्णदयार्णवाच्या हरिवरदाचें एक पारायण झाल्यावर आता पुढें काय वाचूं म्हणून काकासाहेब दीक्षितांनी बाबांस विचारले तेव्हां आता **एकनाथाची वृंदावनाची पोथी** वाच म्हणून आज्ञा झाली. तेव्हां ही कोणती पोथी ते नीट कळेना तेव्हां नाथभागवातचा सुप्रसिद्ध ग्रंथ कै. काकासाहेबांनी बाबांस नेऊन दाखविला व आपण ज्याला वृंदावनाची पोथी म्हणतां तो ग्रंथ याहून आणखी निराळा आहे काय म्हणून विचारतां बाबा म्हणाले की, हीच ती **वृंदांवनाची पोथी** व पुढे हे भागवत वाचतां वाचतां शेवटले म्हणजे ३१ वे अध्यायाचे अंती जेव्हां खालील ओवी दीक्षितांस आढळली तेव्हां त्यांना बाबांचे बोलाचें कौतुक किती वाटलें असावे याचा वाचकांनीच विचार करावा.

ती ओवी अशी:-

**हा एकादश नव्हे जाण। एकतिसां खणांचे 'वृंदावन' ॥**
**एथ नित्य वसे श्रीकृष्ण। स्वानंद पूर्ण निजसत्ता ॥६७॥**

एकदा असें झाले की, त्यांचे एका स्नेह्याने ज्याच्यांत श्रीमद भगपद गीतेवर उत्तमोत्तम सात टीका आहेत असा एक मोठा ग्रंथ मोठ्या प्रेमाने खरेदी करून काकासाहेबांनी तो वाचावा म्हणून त्यांस अर्पण केला. त्याचा त्यांनी आनंदानें स्वीकार केला व एक दिवस संधि पाहून तो ग्रंथ दीक्षितांनी बाबांचे हाती देऊन त्यासंबंधानें झालेली हकीकत बाबांस निवेदन करून तो वाचूं का म्हणून परवानगी विचारतां बाबांनी त्या ग्रथांची काही पाने चाळून काकासाहेबांस परत दिला व म्हणाले, आपल्या दोन पोथ्या आपल्याला आहेत (म्हणजे **एकनाथी भागवत व भावार्थरामायण)**

तात्पर्य या आज्ञेचे परिपालन काकासाहेबांनी अखेरपर्यंत अव्याहतपणें केले. त्यांना मराठी, हिंदी, संस्कृत व इंग्लिश या भाषा चांगल्या येत असतां व या भाषेंतील अनेक उत्तम ग्रंथांनी त्यांची कपाटे भरलेली असतां या दोन ग्रंथाखेरीज त्यांनी परमार्थपर तिसरा ग्रंथ वाचला नाही. त्यांच्या सहवासांत मलाही या दोन ग्रथाविषयी फार उत्पन्न होऊन ते वक्ते व मी श्रोता असा त्यांचा माझा संबंध वर्षभर नियमानें आल्यामुळें त्या दोन्ही ग्रंथातील काही अप्रतिम भाग सार रुपाने श्रीसाईलीलेचे वाचकांस वेळोवेळी देत गेल्याने त्या रूपाने तरी श्रीसमर्थ बाबांची व त्यांचे भक्तांची एक सेवाच केल्यासारखें होईल असें वाटल्यावर ती करावयास मी आजपासून सुरूवात करीत आहे.

OOO

## जय जय श्री गुरुदेवा



जय जय श्री गुरुदेवा।
जय जय श्री गुरुदेवा।

नाही मला ठावे काय योग
काय ती ध्यानधारणा,
करितो मी मनोभावे
आपुली चरण सेवा
जय जय श्री गुरुदेवा ॥

ध्यास लागला तव भक्तिचा
सूत्रा धरिले तव नामाच्या
कृपासवे तुम्ही मज पावा
जय जय श्री गुरुदेवा ॥

गत जन्मीचे पुण्य मानतो
ह्या जन्मीचे भाग्य समजतो
अखंड ठरो माझी आत्मदायी भावसेवा
जय जय गुरुदेवा ॥

❑ **सुरेन्द्र गाडवे,** पुणे.

# संतकवि दासगणू विरचित
# साईभक्तीपर गुरूपाठाचे अभंग

— ❖ ❖ ❖ —

**संतकवि या पदाला पोचलेले महाराष्ट्रातील थोर साईभक्त दासगणू महाराज हे पूर्वाश्रमी पोलीस हवालदार व लावणीकार होते. श्रीगुरू साईनाथांच्या कृपेने ते संतकवि झाले. त्यांनी श्रीगुरू साईनाथांवर लिहिलेले गुरूपाठाचे अभंग साईभक्तांनी संध्येसारखे नित्यपठण करावेत म्हणून गुरूपौर्णिमेच्या या अंकात मुद्दाम त्याचा समावेश केलेला आहे.**

— ❖ ❖ ❖ —



या जगात घेण्यासारखे काय आहे या प्रश्नाचे उत्तर देताना जगदगुरू शंकराचार्य म्हणतात, गुरूवचन. गुरूचे वचन हे या जगात घेण्यासाठी आचरण्यासाठी सर्वात योग्य आहे. ज्याच्या वचनाची एवढी महती तो सदगुरू कसा असावा? त्याची महति काय आहे? हे सर्व श्रीदासगणु महाराज आपणास या गुरूपाठांच्या २५ अभंगाद्वारे समजावत आहेत. जे खरे संत आहेत त्यांच्या साध्या बोलण्यातूनही उपासकाला, भक्ताला मार्मिक सूचना मिळत असतात. त्यांच्या प्रेमाच्या प्रभावामुळे माणसे नैतिकदृष्ट्या खरेच सुधारतात व त्यातच सातत्य साधले तर उपासकाचे मन खरेच ईश्वराकडे वळते. त्याला समाधानाचा खात्रीचा मार्ग सापडतो.

मनोबोधाचे विवरण करतांना ह. भ. प. श्री. अ. दा. आठवले यांनी म्हटले आहे मनुष्यमात्राला आपल्या प्रगतीसाठी गुरूची म्हणजे मार्गदर्शकाची नितांत आवश्यकता आहे. मग ही प्रगती अध्यात्माच्या वा व्यवहाराच्या अशा कोणत्याही क्षेत्रातील असो, पण खास गुरू कोणास म्हणावे वा खऱ्या गुरूची आवश्यकता कोणत्या कारणासाठी असते हे सामान्यत: कुणी लक्षात घेत नाही आणि त्यामुळे असंख्य प्रकारचे लोक गुरू म्हणून वावरत असतात.

मग खरा गुरू व खोटा, दांभिक यातील भेद कसा ओळखावा हे समर्थ रामदासांनीही मनाचे श्लोकात स्पष्टपणे सांगितले आहे. गुरू ची आवश्यकता पटविताना श्रीदासगणु महाराजही म्हणतात **सगुणोपासना ही अध्यात्म्याची बाराखडी आहे आणि ही बाराखडी सदगुरू शिकविती.** त्यांचे गुरू श्री वामनशास्त्री खरे, पण त्यांच्यानंतर त्यांचेच आज्ञेप्रमाणे श्रीदासगणु महाराजांनी श्रीसाईबाबांना गुरू मानले. त्या श्रीसाईबाबांचे सामर्थ्य या अभंगातून श्रीदासगणु महाराजांनी वर्णिले आहे. त्यांचे सामर्थ्य वर्णितांना श्रीदासगणु महाराज चमत्कारात अडकत नाहीत. त्यातून स्वत:च्या पारमार्थिक उन्नतीसाठी योग्य असा अर्थ काढून स्वत:सह इतरांचे कल्याण करतात. श्रीसाईबाबांनी पाण्याचे तेल केले हा चमत्कार खरा पण त्याचा अर्थ लावतांना श्रीदासगणु महाराज म्हणतात.

**गणु म्हणे माया दुर्धर अंधार**
**ज्ञानदीप थोर म्हणुनी लावा**

सदगुरूविषयी शिष्याचा भाव कसा असावा त्यांनी १० व्या अभंगात स्पष्ट केले आहे. आजकाल स्वत:च्या गुरूचाच संप्रदाय समजून इतरांचा द्वेष करण्याची घातक प्रथा बळावत आहे. या पार्श्वभूमीवर महाराजांची उदात्त समन्वयात्मक भूमिका आदर्श दीपस्तंभा सारखी ठरते ते म्हणतात.

**त्रिभुवनामाजी जे जे कोणी संत।**

ते ते साईनाथ मजलागी ॥

पुढे २० व्या अभंगात सद्गुरूची कृपा होण्यासाठी जी साधना करावी लागते, जे व्रत अंगिकारावे लागते, ते सांगतात व ते व्रत पाळल्यास तुमचा गुरू हा चिंता वारणारा चिंतामणी ठरेल ही ग्वाही देतात.

गुरूपाठाचे अभंग

जयाची तीं रूपें सगुण निर्गुण ।
ऐसा नारायण वंदू आधीं ॥
सगुण सेवितां निर्गुण ये हातीं ।
निर्गुणाची प्राप्ती आरंभी ना ॥
आधिं मूल काढी क, ख, बाराखडी ।
मग शब्द जोडी झाल्या ज्ञान ॥
गणु म्हणे तैसी सगुणोपासना ।
बाराखडी जाणा अध्यात्माची ॥१॥

* * *

ती ही बाराखडी शिकवी जो गुरू ।
भवाब्धीचें तारूं तोच जाणा ॥
गुरूसेवा हीच प्रथम पायरी ।
असे टिकण्या भारी अवघड ॥
सदगुरूरायाची कृपा संपादितां ।
सेवेचीपूर्तता सहज होई ॥
गणु म्हणे केल्या प्रसन्न सविता ।
प्रभेची न्यूनता केविं पडे ॥२॥

* * *

सदगुरूची सेवा बहुतांनी केली ।
ऐसी साक्ष दिधली पुराणांनी ॥
पूर्णब्रम्ह राम जानकीचा कान्त ।
झाला शरणागत वसिष्ठांसी ॥
रूक्मिणीवल्लभें केला संदीपनी ।
आपणालागुनी गुरूराय ॥
गणु म्हणे गुरूवांचूनिया नर ।
तोचि जाणा खर दो पायांचा ॥३॥

* * *

निष्ठावंत भाव हाच देतो फळ ।
अभक्तिचा मळ निमालीया ॥
चहाड-दुतोंड्या ऐसा नारद मुनी ।
परि झाला तरणी प्रल्हादातें ।
गोपिचंदें गुरू लिदीसी गाढीला ।
पुढें तोचि झाला वंद्य त्यातें ॥



गणु म्हणे सोनें चढे मोला अंगें ।
कसोटीच्या संगें जगामाजीं ॥४॥

* * *

क्षमा, शांती, दया असे जया ठायीं ।
तैसें ज्ञान पाही संपूर्ण कतें ॥
जयाचिये शिरी ईश्वराचा हात ।
तोच सदगुरूनाथ करावा हो ॥
बाहेरील सोंगा भुलूं नका कदा ।
पतंगातें दगा दीपापाशी ॥
गणु म्हणे हंस पाण्यातें टाकूनी ।
घेतसे शोधोनी जैसें दूध ॥५॥

* * *

हिरे आणि गारा एक्याच खाणींत ।
तैसे बद्ध-मुक्त जगामाजीं ॥
पारखी तो येतां हिरा घे वेंचोनी ।
कुक्कूट पायांनी कालवी तो ॥
मुमुक्षु पारखी चार्वाक कोंबडा ।
कुक्कूटा उकिरडा गोड वाटे ॥
गणु म्हणे जो कां असे भाग्यवंत ।
तयाचाच हेत गुरूपायीं ॥६॥

* * *

क्षमाशांतीयुक्त भवाब्धींचे जहाज ।
ऐसा सदगुरूराज शिर्डीमाजीं ॥
नामाभिधा जयाची शोभे बाबा साई ।
अनाथांची माई तीच जाणा ॥
अनाथ सनाथ हा न भेद जेथें ।
सूर्यप्रकाशातें निवड कैंची ॥
माझा गुरूराज जान्हवीचें जळं ।
गणु अर्पी भाळ तया पायीं ॥७॥

* * *

अंगकाठी उंच केलीसे धारण ।
कळवावया खूण भक्तजनां ॥
उच्य ज्ञान जें कां अध्यात्म साजिरें ।
तोंचि सेवा सारें कल्याणार्थ ॥
परि नका सोडूं ठेंगणी लीनता ।
न ये थोर होतां बाल्यावीण ॥
गणु म्हणे वर्ण तांबूस सांवळा ।
सदगुरूची लीला अगाधची ॥८॥

* * *

सदगुरूरायांनें जला तेल केलें ।
दीप उजळीले लक्षावधी ॥
ठेवुनिया दीप उशापायथ्याशीं ।
पहुडे फळीसी गुरूमूर्ती ॥
त्यांच्या त्या कृतीचा हाच आहे अर्थ ।
कदा अंधारांत निजूं नये ॥
गणु म्हणे माया दुर्धर अंधार ।
ज्ञानदीप थोर म्हणुनी लावा ॥९॥

* * *

शिवविष्णूब्रम्हारूप बाबा सांई ।
भाव दुजा कांही मानूं नका ॥
सदगुरूरायाच्या पायाची जी धूळ ।
तेंच गंगाजळ शुद्ध माना ॥
अमृताआगळीं मुखींची वचनें ।
तींच माना मनें गीता जेवीं ॥
गणु म्हणे बाबा वसंत सोज्ज्वळ ।
भक्तांनो कोकीळ व्हा रे तुम्ही ॥१०॥

* * *

परमार्थाची आस ज्यास मनापून ।
त्यानें हे चरण पहावे आधीं ॥
ऐहिक सुखाशी देवोनिया फांटा ।
भक्तीच्या त्या वाटा धुंडाळाव्या ॥
द्वेषाचे सराटे फेंकूनीया द्यावे ।
सांईमय पहावें जगालागी ॥
गणु म्हणे तरी तुम्ही त्यांचे भक्त ।
शोभाल जगांत सज्जनांनो ॥११॥

* * *

शिर्डीक्षेत्र नोहे पचंबा बाजार ।
तेथें दुकानदार परमार्थाचा ॥
ऐहिक सुखाची खेळणी बाहुल्या ।
समूळ फेंकिल्या गुरूरायें ॥
कां कीं तयामाजीं किमपि ना अर्थ ।
फसतील व्यर्थ पोरें माझीं ॥
गणु म्हणे पोर पचंव्यासी जातें ।
किरकिरेंच घेतें आवडीनें ॥११२॥

* * *

कर्म भक्ती ज्ञान बाजारीं या माल ।
मनिं जो वाटेल तोचि घ्यावा ॥
तिघांची किंमत एक आहे जाणा ।
फळहि तिघांना एकची हो ॥
भावरूपी द्रव्य पाहिजे तयासी ।
सांई सदगुरूसी दुजें न लगे ॥
गणु म्हणे भाव-नाणें जयापाशी ।
त्याने बाजाराशीं येथें जावें ॥१३॥

* * *

फळ तें पाथेय, घ्यावें फराळाशी ।
मग पंढरीसी जावें सुखें ॥
बाबाजीनें कृपा तुकोबासी केली ।
तयिंच फळली पंढरी त्या ॥
थापटणे गोऱ्यानें मारूनि नाम्याला ।
कच्चा ठरविला देवापुढें ॥
गणु म्हणे मग खेचर माऊली ।
नाम्याने वंदीली कल्याणार्थ ॥१४॥

* * *

निवृत्ती ज्ञानेश ईश्वरी अवतार ।
परी गुरूवर गहिनी केला ॥
गुरूकृपेंवीण एकालाही जनीं ।
विठू चक्रपाणी भेटला ना ॥
पंढरीरायाची मनिं असल्या आस ।
सदगुरूची कास दृढ धरा ॥
गणु म्हणे तया भवाचें ना भय ।
ज्याचे चित्ती पाय सदगुरूचे ॥१५॥

* * *

शुकसनकादि नारद अंबरीष ।
निवृत्ती ज्ञानेश नामा तुका ॥
दास तुलसी चोखा जयदेव सांवता ।
पंत नाथ मेहेता कबीर तो ॥
बोधला पवार विसाबा खेचर ।
गोरोबा कुंभार कूर्मदास ॥
गणु म्हणे त्याच कोटींतला सांई ।
चला त्याच्या पायीं लीन होऊ ॥१६॥

* * *

जरि त्या संतांच्या मूर्ती हो लोपल्या ।
सांईरूपे उरल्या पहावया ॥
त्रिभुवनामाजीं जे जे कोणी संत ।
ते ते सांईनाथ मजलागीं ॥
भेदबुद्धी नुपजो माझी संतांठायीं ।
संत शेषशायी प्रत्यक्षची ॥

गणुदास आहे संतांचा अंकीत ।
भेटो पंढरिनाथ त्यांच्या कृपें ॥१७॥

* * *

भक्तिरूप गंगा वाहे जया ठायीं ।
तेथें माझा सांई राहे उभा ॥
हस्तसंकेतानें पालवीतो लोकां ।
या हो फिरूं नका रानोमाळ ॥
मज ओळखावें आहें मी कोठला ।
कशासाठीं आला शिरडीसी ॥
पंढरी क्षेत्रींचा मीच हो वाटाड्या ।
गणूच्या त्या उड्या सांईबळे ॥१८॥

* * *

मज नविचारितां पंढरीच्या वाटे ।
जाल तरी कांटे रूततील ॥
पंढरीची वाट मोठी अवघड ।
मोठे मोठे पहाड मार्गामाजीं ॥
तयाचे तें वज्र आहे मजपाशीं।
तसा हृषीकेशी ओळखीचा ॥
गणु म्हणे जन्मोजन्मीं नाही तूटी ।
सांईच्या जगजेठी हृदयांत ॥१९ ॥

* * *

म्हणून ही संधी दवडूं नका कोणी ।
पडाल मागूनी पस्ताव्यांत ॥
दंभाचें गांठोंडें एकीकडे ठेवा ।
विकल्प सोडावा घातक जो ॥
क्रोधाची ती होळी ज्ञानग्नीने करा ।
वासनेसी मारा अभ्यासानें ॥
गणु म्हणे ऐशा व्रतासी जो पाळी ।
तयासी सांभाळी सांई माझा ॥२०॥

* * *

करूं नका नाश या आयुष्याचा ।
जन्म मानवाचा पुन्हां नाहीं ॥
प्रत्येक जन्मांत कन्या पोरे घर ।
मैथुन आहार आणि निद्रा ॥
नरजन्म नाही ऐशा कृत्यासाठी ।
बांधा खूणगांठी मनामाजीं ॥
जोडूं जातां जोडे जन्मीं या ईश्वर ।
नरजन्म थोर गणु म्हणे ॥२१॥

* * *



लोभ मोह माया टाकून अवघ्यांची ।
धरा सद्गुरूची पाऊलें ती ॥
गुरुपायामाजी आहे सर्व काही ।
गुरुवीण नाही सार्थकता ॥
गुरू कामधेनू गुरू कल्पलता ।
चिंतेसी वारिता चिंतामणी ॥
गुरुभक्तीठायीं जो कां एकनिष्ठ ।
त्रिलोकी तो श्रेष्ठ गुण म्हणे ॥२२॥

* * *

गुरुपदीं भाव विठूसी अबोला ।
ऐशा मानवाला मोक्ष नोहे ॥
भोपळा हातांत परि धोंडा कंठीं ।
बांधिल्या शेवटी घात घडे ॥
गुरुरूपी देह आत्मा पांडुरंग ।
केल्या येई रंग एक्या ठायी ॥
एक्या अव्हेरीतां एक न ये हातां ।
दोघांची योग्यता सारखीच ॥
गुरु आणि देव यांत केल्या तूटी ।
दुःखाची नरोटी येईल हातां ।
गणु म्हणे राहा सावध यासाठीं ॥
गुरु जगजेठी एकरुप ॥२३॥

* * *

साईबाबा आणि सद्गुरू वामन ।
हें न दोघे भिन्न एकरूप ॥
भाव साधकांनी ठेवा. दोघांपायी ।
परि विठाबाई गावी वाचे ॥
साई-वामनाचे करावें पूजन ।
राखावा सन्मान भूपतीचा ॥
परमार्थात भक्ती व्यवहारी नीती ।
संसारी विरक्ती गणु म्हणे ॥२४॥

* * *

गुरुपाठाचे हे अभंग पंचवीस ।
जपतां होय नाश पातकांचा ॥
गुरुंचे पवाडे गाता मोक्ष लाधे ।
नका मरुं दंभे निरर्थक ॥
साईमहाराजांचा धरुनिया हात ।
तरा भवाब्धींत बुडूं नका ॥
साईंच्या इच्छेने होतें अवघें काही ।
गणूकडे नाहीं बोल त्याचा ॥२५॥

ooo

# ॥ कृष्णं वंदे जगज्गुरू ॥

डॉ. गुणवंत शहा



— ❖ ❖ ❖ —

**श्री साईबाबांनी बुट्टी यांना जो वाडा बांधण्यास सांगितला त्यामध्ये त्यांना मुरलीधर श्रीकृष्णाची मूर्ती बसवायची होती. ती मूर्ती तयार करण्यासही एका शिल्पकारास सांगितले होते. हे लक्षात घेता साईश्रींना श्रीकृष्णाचे वाटणारे महत्त्व कळून येते.**

**श्रीकृष्ण हा विष्णुंच्या दहा अवतारातील पूर्णावतार आहे. म्हणूनच सर्वांनी एकमुखाने 'कृष्णम् वंदे जगद्‌गुरू' असे जगाचे गुरुपद बहाल करून त्यास वंदन केलेले आहे अशा श्रीकृष्णाचे हे एक युगानुकुल शब्ददर्शन -**

— ❖ ❖ ❖ —

भारत देशातून रामायण आणि महाभारत काढून टाकले तर शिल्लक काय उरेल याचा जरा विचार करून पाहा. केवळ भारतातच नव्हे तर आग्रेय आशियातील बऱ्याच देशांच्या लोकजीवनात रामायण-महाभारत ही गुंफली गेली आहेत. थायलंडच्या मूळ राजधानीचे नाव 'अयुध्या' होते आणि राजांची नावे 'राम-१,' 'राम-२', 'राम-३' अशी क्रमवारीने होती. पहिली विश्वरामायण परिषद इन्डोशियात भरली होत. त्यात मुसलमानांनी रामायण वाचले. मॅरिशमध्ये रामायण नाही अशी घरे फारच कमी असतील.

महाभारत हे जगातील सर्वात मोठे महाकाव्य आहे. श्री. उमाशंकर जोशी तर त्याला 'विराट काव्य' म्हणतात. ग्रीसची महाकाव्ये 'इलियड' आणि 'ओडिसी' यांच्या आकाराच्याही आठपट महाभारत भरेल. आपली नाट्यशास्त्रे, धर्मशास्त्रे, राज्यशास्त्रे, काव्ये आणि कथानके यांपासून लोकजीवनाच्या लहान मोठ्या बहुतेक क्षेत्रात महाभारताचा प्रभाव आढळून येतो. सहाव्या शतकात कंबोडियाच्या देवळात त्याचा पाठ होत असे. इ. स. पूर्वी पाचव्या शतकात ग्रीक वकिलांने महाभारतातील अवतरणे उद्धृत केली आहेत. तुर्कस्थानात देखील महाभारत बरेच लोकप्रिय होते. दहाव्या शतकात जावाच्या लोकांनी त्यांच्या भाषेत सबंध महाभारत उतरविले होते.

'गीता' हा महाभारताच्या उद्यानात बहुशाखांनी विस्तारलेला रमणीय आणि डेरेदार महाद्रुम. कृष्णाच्या जीवनातील परम योगारूढ अवस्थेत जे शब्द बाहेर पडले ते गीतेत पकडले गेले आहेत. त्या विलक्षण क्षणी कृष्णाचे जीवनसंगीत प्रगट झाले. कृष्णाच्या या दिव्यगानाने जगातील महान विचावंतांना प्रभावित केले. आधुनिक अणुविज्ञानवेत्ते आणि महान चिंतक **फ्रिट्जॉक् काप्रा** हे तर भौतिक विज्ञानाच्या अनेक संकल्पना गीतोपदनिषदाच्या संदर्भात समजावून देत असतात. **टी. एस्. इलियट** सारख्या महान कवीवर गीतेचाच प्रभाव पडलेला दिसून येतो. **महान चिंतक थोरो** गीतेवर मोहित झाला होता. **इमर्सन** गीता ही मानवजातीची सर्वश्रेष्ठ संपदा मानीत असे. तो जेव्हा 'सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानिचात्मनि' सारखे गीतवचन वाची तेव्हा पुलकित होऊन नाचू लागे आणि किती तरी वेळ त्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहात. **एक चिनी महात्मा** गीता वाचून कृष्णावर फिदा झाला होता. गीता वाचून रोज दोन चार वेळा तरी तो प्रेमरुदन करी. चिनी त्याला **'किषनजी'** म्हणत. त्यामुळे त्याचे मूळ नावच मिळत नाही. प्रसिद्ध विचारवंत **अल्डस् हक्स्ले** गीतेचा फार मोठा प्रशंसक होता. गीतेचा युगसंदेश केवळ भारतापुरताच नाही तर समस्त मानवजातिकरिता आहे असे तो मानी. भारतात इंग्रजी

राज्याचा पाया घालणारा **वॉरन हेस्टिंग्ज** मानीत असे की नीतीला उन्नतीच्या टोकाला पोचविण्याकरिता गीतेचा उपदेश अद्वितीय आहे. **अकबराचा नातू दारा** म्हणत असे की, 'गीतेची पुरती प्रशंसा करण्याची माझ्यात शक्ती नाही.'

गीता हा पूजेचा ग्रंथ आहे असे मी मानीत नाही. लाल बस्त्यात गुंडाळून रोज तिच्यावर फूल वाहण्याने काय साधणार ? ती वाचण्याच्या श्रमातून निसटण्यासाठी हा पावित्र्याचा बहाणा हाताशी लागण्याजोगा आहे खरा ! असा सन्मान केव्हा केव्हा शवालासुद्धा मिळतो. दोन पुठ्ठ्यांच्या पक्क्या बांधणीत बसलेल्या कागदावर छापलेले श्लोक, आपल्या प्रत्येक स्खलनाच्या प्रसंगी जर आपल्याला टोचतील आणि प्रतिबंध करतील तरच काही उपयोग ! इतकी आत्मीयता अंगी बाणणार नाही तोवर गीता ही छापलेल्या कागदांची निर्जीव रासच म्हणायची. गीतेचे अध्याय पाठ आहेत हीदेखील फार हरखण्यासारखी बाब नाही. कधी तीही एक अहंकारालाच पोषण देणारी गोष्ट बनू शकते. बेडकाचे डरावं डरावं आणि एखाद्याचा न समजता होणारा गीतापाठ या दोहोत फारसा फरक म्हणता येणार नाही.

कधी मनात येईल की आपल्या तरुणांना गीता वाचण्यात किंवा समजून घेण्यात काही गोडी आहे का ? द शार्दिनच्या शब्दांत याला उत्तर मिळते. तो म्हणतो : ''भविष्य अशा लोकांच्या हाती आहे की जे उद्याच्या पिढ्यांना जगण्याकरिता व आशा बाळगण्याकरिता पुरेशी कारणे देऊ शकतील.'' **वेद हे आपले मूल्यवान संदर्भग्रंथ, उपनिषदे आपली पाठ्यपुस्तके तर गीता ही आपली मार्गदर्शिका आहे.** पण दुःखाची गोष्ट की ती आपल्याकडे उतारवयाशी जोडली गेली आहे. गीता न समजून घेता म्हातारे होणे हा तोट्याचा धंदा आहे. आणि कृष्णाचा म्हातारपणाशी काय संबंध ? नव्या पिढीच्या तरुणांपर्यंत गीतेचा संदेश पोचविण्याकरिता आपल्यालादेखील त्यांना समजेल अशी भाषा शिकावी लागेल.

माझ्या या पुस्तकाचे एक वैशिष्ट्य आहे. एका सामान्य माणसाच्या द्वारा सर्व प्रकारे असामान्य अशा ग्रंथांचे भाष्य करण्याचा हा प्रयत्न आहे. कदाचित् त्यानेच या प्रयत्नाचे महत्त्व वाढण्याचा संभव आहे. एक शाळकरी पोर दुसऱ्या शाळकऱ्यांना काहीतरी समजविण्यासाठी धडपडावा, तसा हा खेळ आहे. कधी असेही होते की एखाद्या विद्यार्थ्याला दुसऱ्या विद्यार्थीने समजाविल्याने चटकन समजूत पटते. नव्या पिढीला उपदेश आणि उपदेशक यांची ॲलर्जी असते. गीतेच तत्त्वज्ञान त्यांच्यापुढे नव्या शैबलीत, नव्या संदर्भात आणि नवे अर्थ लावून मांडले तर हे तरुण या तत्त्वज्ञानाकडे अवश्य आकर्षले जातात असा माझा अनुभव आहे. तरुणांना त्यांच्याच मार्गावर जाऊन भेटण्याचा हा माझा नम्र प्रयत्न आहे.

### युगायुगाला नवा कृष्ण

गीतेत जो कृष्ण आपल्या पुढे प्रगट होतो तो योगेश्वर कृष्ण आहे. तो दोन प्रकारे आपल्याला साहाय्यक होतो. सर्चलाईट होऊन तो आपल्या जीवनमार्गावर प्रकाश अंथरतो, आणि दीपस्तंभ होऊन दूर राहिल्या राहिल्या प्रत्येक क्षणी आपल्या जीवननौकेला खडकावर जाऊन आपटायला प्रतिबंध करतो. जीवनात घटकोघटकी मार्गदर्शक बनावा असा, व्यवहारी तरी उदात्त, खूप खोली असलेला तरी समजेल असा आणि प्राचीन असूनही अर्वाचीन संदर्भात योग्य असा हा गीता ग्रंथ कृष्णावतार काळी कोणा एका क्षणी बाहेर पडलेल्या अलौकिक उद्गारांचा संग्रह आहे. त्याची विशेषता ही की अर्जुनाच्या सर्व दुर्बलता खरोखर आपल्याच दुर्बलता वाटाव्यात. कृष्ण अर्जुनाला जर साक्षात् मदत करतो तर तो आपल्याला का नाही करणार? कृष्णापुढे अर्जुन आपल्या शंका मांडीतच राहतो. कृष्ण सांगतो ते जर अर्जुनाने डोळे मिटून मान्य केले असते तर आपल्याला काहीच लाभ झाला नसता. त्याच्या या शंकाशीलतेबद्दल आपण सगळे त्याचे ऋणी आहोत.

आपल्या शंका खरोखरच शंभर नंबरी असतात का? पुष्कळ लोक काही घ्यायचे नसले तरी उगीचच दुकानदाराला भाव विचारतात. दुकानदार अशा लोकांना ओळखतो. प्रायः याच रीतीने कित्येक वेळा लोक संन्याशाला प्रश्न विचारतात. प्रश्न आणि पृच्छक यांच्यात अंतर्गत संबंध नसतो तेव्हा त्या प्रश्नाला सार्थकता राहत नाही. विचारायचे म्हणून विचारलेला प्रश्न म्हणजे चाकूच्या बिनधारेच्या बाजूने बटाटे चिरण्याचा प्रयत्न. तसे अर्जुनाने केले नाही. आपल्या मनाचा गोंधळ तो कृष्णापुढे व्यक्त करीत गेला. कृष्णाने त्याच्या शंका दूर करताना अपार धीर आणि करुणा दाखविली. त्यामुळेच गीतेचे हे अमृत आपल्याला मिळाले. शंका नाहीशी होत नाही तोंवर चिकाटी न सोडणारा अर्जुन आणि अपार धीराने त्याच्या शंकांचे निर्मुलन करणारा कृष्ण अशी जोडी जगात कुठे मिळणार नाही. **थोडक्यात म्हणजे गीता हे करुणामंडित आणि औदार्यपूर्ण सख्यभावाचे अप्रतिम काव्य आहे.** भक्त आणि भगवान यांच्यामधला असा मैत्रीपूर्ण व्यवहार इतरत्र कुठेही पाहायला मिळत नाही. क्वचितच एखाद्या मैत्रीला गीतामृताची उच्चता लाभल्याचे घडते.

जीवनात आपल्याला क्षेत्रफळाचे महत्व समजते, पण खोलीचे किंवा उंचीचे महत्त्व चटकन लक्षात येत नाही. शेत मोठे असले तरी त्याने काय होणार? गोड्या पाण्याची एक विहीर त्या शेताला हिरवे बनवून टाकते. जीवनात माणसाला केवळ कुडबुड्यांनी संतोष होत नाही. त्याला खोलातले काही मिळावे अशी आस असते. कंबरभर पाण्यात उभे राहून रेतीच्या टोपल्या काढणाऱ्याला मोती कसे मिळतील? त्यासाठी त्याला

पाणबुड्या बनून सागराच्या तळाशी डुबकी मारावी लागेल. केवढ्या क्षुल्लक बाबीसाठी आपले जीवन खलास होत असते! आणि या क्षुल्लक बाबी आपल्याला किती महत्त्वाच्या वाटतात! जीवनाच्या अंती केव्हातरी लक्षात येते की, आपण ज्याला हिमालयाइतके महत्व दिले होते तो तर मातीचा लहानसा ढीगच होता! उकिरडा हा डुकराचा स्वर्ग!

आता कृष्णदेखील तशाचा तसा असून चालणारा नाही. 'संभवामि युगे युगे'चा अर्थ असा नाही की, तोच तो पीतांबरधारी, मोरमुकुटधारी, बंसीवादक, सुदर्शनधारी, गोपीवल्लभ आणि लोणीचोर कृष्ण आणीबाणीतून सोडविण्यासाठी परत आपल्यात यावा. असा तीनचार हजार वर्षांचा जुना पुराणा (आउट ऑफ डेट) कृष्ण आला तर आजची जनता त्याला स्वीकारूच शकणार नाही. त्याचे हसे होईल व तरुण मंडळी तर त्याची रेवडीच उडवितील. 'संभवामि युगे युगे'चा खरा अर्थ हा की, नव्या युगाच्या नव्या आकांक्षांची पूर्ती करण्याकरिता कृष्ण नव्यानव्या स्वरूपात नित्य प्रगट होतच असतो. प्रत्येक युगी नवे अवतारकृत्य घेऊन कृष्णाने अवश्य यावे. गांधीजींनी 'अनासक्तियोगा'त म्हटल्याप्रमाणे 'अवतार म्हणजे देहधारी पुरुषविशेष'. त्या त्या युगाच्या त्या त्या सामूहिक आकांक्षेच्या परिपूर्तीकरिता जो पुरुषविशेष प्रगट होईल तो अवतार मानला जाईल. युगायुगांमध्ये कृष्णानेदेखील नवी शरीरे धारण न करून कसे चालेल?

**ज्ञानाच्या दृष्टीने कृष्ण योगेश्वर आहे, भक्तीच्या दृष्टीने रसेश्वर आहे आणि कर्माच्या दृष्टीने तो राजेश्वर आहे.** या तिन्ही कक्षांच्या समन्वयातून आपल्याला गीतेचा लोकमहेश्वर कृष्ण लाभला आहे. कृष्णाच्या विभूतिमत्त्वासाठी एकच शब्द पुरेसा आहे, तो म्हणजे: **सर्वलोकमहेश्वर.**

## धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे

गीतेचा प्रारंभ धृतराष्ट्राच्या प्रश्नाने होतो हे विशेष लक्षणीय आहे. महाभारताचे रचयिता व्यास यांची काव्यदृष्टी येथे प्रगट होते. शरीररूपी राष्ट्राला धारण करणारा, मायेच्या आवरणाने अंध आणि माझ्या तुझ्या (मामका: पाण्डवा:)च्या भेदबुद्धीने ग्रस्त असा जीव तो धृतराष्ट्र. या अर्थी आपण सगळे धृतराष्ट्र आहोत. आपण मागे पाहिले त्याप्रमाणे गीता हा रहस्यमय उद्गारविशेष आहे. काव्यांत जे स्थान ध्वनीचे आहे ते स्थान शास्त्रांत रहस्याचे आहे. काव्याचा ध्वनी संवेदनशीलतेशिवाय पकडला जात नाही. याच प्रकारे शास्त्रांचे रहस्य पायाभूत संस्कारांवाचून पकडता येत नाही. आपला आंधळेपणा म्हणजे आपल्या मनाचा आंधळेपणा. या जगात डोळे असून आंधळे, कान असून बहिरे, पाय असून लंगडे आणि जिवंत असून मेलेल्या माणसांचा तोटा नाही. जगात आपण जे काही पाहतो ते पाहण्यालायक, जे काही ऐकतो ते ऐकण्यालायक, ज्या ठिकाणी जातो ते जाण्यालायक आणि जसे जगतो ते जगण्यालायक क्वचितच असते. **गीता आपल्याला द्रष्टव्याचे, श्रोतव्याचे, गंतव्याचे, कर्तव्याचे आणि जीवनध्येयाचे ओझरते दर्शन घडविते.** आपणा सर्वांच्यामध्ये असलेल्या धृतराष्ट्राला शोधून काढाचये आहे आणि अंती आपल्यातच असलेल्या कृष्णाला प्राप्त करायचे आहे.

कुरुक्षेत्र म्हणजे कर्मक्षेत्र. कर्ट ल्युइस नावाचा एक मानसशास्त्रज्ञ क्षेत्रसिद्धांत (फील्ड थियरी) सांगून प्रत्येक माणसाच्या जीवनावकाशाविषयी (लाइफ-स्पेस विषयी) बोलतो. आपला जीवनावकाश म्हणजे आपले कर्मक्षेत्र. वाण्याचे दुकान हे त्यांचे कर्मक्षेत्र आहे. शिक्षकाचे कर्मक्षेत्र त्याची शाळा. सहकारी कर्मचाऱ्याचे कर्मक्षेत्र त्याचे ऑफिस. फाशीच्या तक्तावर दोरी ओढून, मृत्युदंड झालेल्या माणसाला मारण्याचे कर्तव्य बजावणाऱ्या नोकराचेदेखील कर्मक्षेत्र असते. असे कर्तव्य बजावणाऱ्याने एखाद्या स्वजनाला फाशी द्यायच्या वेळी त्या शिक्षेत असलेल्या क्रूरतेचा विचार मनात आणून अगदी आयत्या वेळी दोरी ओढण्याचे नाकारले तर ते चालेल? परीक्षा पद्धतीत दोष पुष्कळ आहेत, परंतु आपला मुलगा नापास झाला म्हणजेच त्या शिक्षकाला त्या दोषांची आठवण होते तेव्हा काय समजावे? थोडे खोल उतरून पाहिले तर लक्षात येईल की, अशा प्रसंगी अंतरात दडलेला मोह आपल्या तोंडून वेगळी भाषा बोलवितो.

तीच स्थिती अर्जुनाची झाली. तो खरा म्हणजे वीर, पण मोहामुळे किंकर्तव्यमूढ झाला. **गीतेचा उद्देश मोहनिरसन हा आहे.** तडजोडीची सर्व प्रयत्न निष्फळ झाल्यानंतर युद्ध उभे ठाकले आहे. कृष्णानेही तडजोडीचा शेवटचा प्रयत्न करून पाहिला, पण दुर्योधनाने आपला हट्ट सोडला नाही. कुरुक्षेत्राच्या मैदानावर युद्धाची सगळी सिद्धता झाली आहे. शंख, नगारे, रणशिंगे इ. रणवाद्ये वाजायला लागली. श्रीकृष्णाने आपला पांचजन्य, अर्जुनाने देवदत्त, भीमाने पौण्ड्र, युधिष्ठिराने अनंतविजयी, नकुलाने सुघोष आणि सहदेवाने मणिपुष्पक या नावाचे शंख वाजवून युद्धाला प्रारंभ करण्याचा हिरवा झेंडा फडकावला. त्या क्षणी अर्जुन कृष्णाला म्हणतो-

**''सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत।''**

''हे अच्युता, माझा रथ दोन्ही सैन्यांमध्ये नेऊन उभा कर म्हणजे युद्धासाठी आतुर झालेल्या योद्धयांना मी बरोबर पाहून घेईन.'' सारथी कृष्ण अर्जुनाच्या सांगण्याप्रमाणे करतो. या ठिकाणी अर्जुनाच्या तोंडी कृष्णाला उद्देशून **'अच्युत'** (जो चळत नाही असा) हे संबोधन घालून व्यासांनी कमाल केली आहे. जसा अर्जुन दोन्ही सैन्यात उभे असलेल्या वडील, पितामह, आचार्य, मामा, बंधू, पुत्र, पौत्र, मित्र, सासरे आणि

स्नेहीजन पाहतो तसा तो लढण्याच्या संकल्पापासून चळू लागतो. त्याची गात्रे ढिली पडतात, तोंड कोरडे पडते, अंग कापू लागते आणि त्याच्या हातातून गांडीव गळून पडते. वीर असून देखील मोहामुळे किंकर्तव्यमूढ बनलेला अर्जुन म्हणतो:

**न कांक्षे विजयं कृष्ण न च राज्य सुखानिच ।**
**किं नो राज्येन गोविंद किं भोगैर्जीवितेन वा ॥**
**विजयाची नसे इच्छा, कृष्णा, राज्यसुखें नको ।**
**घेऊनी राज्यभोगादी, कृष्णा, काय करायचे ॥**

एवढे म्हणून तो थांबत नाही. ''त्रैलोक्याच्या राज्याकरिता सुद्धा मी यांना मारू इच्छित नाही'' - असे म्हणून अर्जुन युद्धामुळे ज्या ज्या विपत्ती ओढवतात त्यांचे विस्ताराने कृष्णापुढे वर्णन करतो. युद्धाच्या योगाने कुळाचा नाश होतो, कुलधर्म नष्ट होतात, कुलस्त्रिया बिघडतात, वर्णसंकर संतती जन्मते इत्यादी, इत्यादी. अशा रीतीने अगदी आयत्या वेळी अर्जुन मागे पाऊल घेतो.

## विषाद नव्हे, विषादयोग

गीतेच्या अठराही अध्यायांना व्यासांनी **'योग'** हा शब्द जोडला आहे. सांख्ययोग, कर्मयोग, कर्मसंन्यासयोग, विभूतियोग, भक्तियोग, क्षेत्रक्षेत्रज्ञयोग, पुरुषोत्तमयोग आणि मोक्षसंन्यासयोग यांसारखे विषय त्यांनी महाभारताच्या कथावस्तूच्या एका अगत्याच्या वळणावर अचूक गुंफून टाकले आहेत. इथे कर्मयोग अथवा भक्तियोग समजू शकतो, पण पहिल्या अध्यायाला 'अर्जुन विषादयोग' हे नाव देऊन व्यासांनी कमाल केली आहे. **गीतेचा प्रारंभ 'विषादयोगा'ने आणि शेवट 'मोक्षसंन्यासयोगा'ने!** 'विषादा'शी 'योग' जोडणे ही काही लहानसहान गोष्ट नाही. गीतेचा संदेश हा आहे की, आपल्यामध्ये जर अर्जुनाइतकी ऋजुता असेल आणि शरणागतीची भावना असेल तर आपला विषाद देखील विषादयोग होऊ शकतो. अर्जुन भले मागे हटू दे, पण तो जसा आहे तसा कृष्णापुढे मोकळा होतो. त्याच्या बोलण्यात कुठेही हातचे राखलेले नाही. त्याचा विषाद अप्रासंगिक खरा, पण तो आहे शंभरकशी! असा निर्भेळ विषादसुद्धा मूल्यवान आहे.

परिस्थिती किती विचित्र आहे! देखणा, कौतुकाचा, सजलेला वरराज लग्नाला निघाला आहे. अंगाला हळद लागली आहे. मुहूर्त होऊन गेला आहे, वऱ्हाडी मंडळींची जेवणावळ झाली आहे, बेंडबाजा वाजून झाला आहे आणि वरराज होमवेदीपाशी आपले आसन घेऊन बसला आहे. पुरोहित आपले विधी आता सुरू करणार एवढ्यात वराला एकदम भान येते की, संसार असार आहे आणि जीवन कालाने ग्रासलेले आहे. आपले आसन सोडून वर आपल्या मित्रांना म्हणतो : ''या मायामोहात मी पडू इच्छित नाही, मला साधू व्हायचे आहे.'' अशी उदाहरणे घडली आहेत. अर्जुन जवळजवळ असेच बोलून आयत्या वेळी पंचाईत आणतो. अशा वेळी आपण असू तर त्या नवऱ्या मुलाला मारायलाच धावू की नाही?

कृष्णालादेखील त्यावेळी चीड आली असेल. पण तो पडला अच्युत! ऐन वेळी बाजू संभाळून घेऊन काम पार पाडण्याचा पराक्रम आयुष्यात त्याने पुष्कळ वेळा केलेला आहे. पुऱ्या अठरा अध्यायांची डोकेफोड केल्यानंतर शेवटी अर्जुन कृष्णाला ''**करिष्ये वचनं तव**'' असे म्हणतो. **अर्जुनाचा विषाद कृष्णाच्या सारथीपणामुळे विषादयोग होऊ शकला.** आपले सारथ्य आपण कृष्णाकडे सोपवायला तयार आहोत का? तसे आपण तयार झालो तर आपले कर्मक्षेत्रदेखील धर्मक्षेत्र बनेल. क्षणोक्षणी आपल्या हृदयात चालणाऱ्या कुरुक्षेत्राच्या युद्धात, कृष्ण आपला सारथी व्हायला उत्सुक होऊन बसला आहे, असे नाही का होणार?

## अर्जुनाची किंकर्तव्यमूढता

अगदी आयत्या वेळी गांडीव टाकून देऊन बसून राहण्यात अर्जुनाची किंकर्तव्यमूढता उघड होते. त्यात अहिंसेच्या भावनेचा उदय नव्हता. समोर स्वजन नसते तर त्याने शत्रूंची डोकी शेतावरील कणसांसारखी उडविली असती. 'अहिंसा' शब्द गीतेत एकूण चार वेळा वापरला गेला आहे हे लक्षात ठेवावे. या पहिल्या अध्यायात वापरलेला 'आततायी' शब्द समजून घेण्यासारखा आहे. 'आततायी' म्हणजे आग लावणारा, विष देणारा, हत्यार घेऊन अंगावर येणारा, धनाची चोरी करणारा, जमीन हडप करणारा आणि स्त्रीचे हरण करणारा. कौरव हे आततायी होते हे युद्धाच्या नौबती झडण्यापूर्वी पुष्कळ वेळा स्पष्ट होऊन चुकले होते. महाभारताच्या काळी आततायीलां तोंड देण्याकरिता युद्धाखेरीज दुसऱ्या काही प्रयुक्तीचा शोध लागला नव्हता. अहिंसा हा आदर्श होता, परंतु व्यवहारात आततायीला मारणे हे क्षात्रधर्माचे भूषण मानले जात होते. मनूने तर 'आततायी बाल असो, वृद्ध असो किंवा बहुश्रुत ब्राह्मण असो त्याला विचार न करता मारावे' असा सल्ला दिला होता.

अर्जुन आपल्या आसक्तीवर अहिंसेचे पांघरूण घालण्याचा प्रयत्न करतो. शत्रूला तोंड देण्याचे दोन मार्ग माणसापुढे आहेत:

(१) शत्रुघ्न मार्ग
(२) अजातशत्रू मार्ग

अर्जुन युद्धामुळे निर्माण होणारी अनिष्टे दाखविताना त्याच्या तोंडी न शोभणारी वचने उच्चारतो. ही भाषा त्याची स्वतःची नाही. ती त्याच्या हृदयदौर्बल्यातून जन्म पावलेली, त्याला परकी असणारी भाषा आहे. अर्जुनाचा खरा मार्ग शत्रुघ्न (शत्रुला मारण्याचा) मार्ग होता, अजातशत्रू मार्ग त्याच्या रक्तात नव्हता. वीराने जर अहिंसा स्वीकारली तर तो महावीर बनतो?

किंकर्तव्यमुढतेचे सर्वात मोठे उपस्थान माणसामधला मोह हे आहे. अर्जुन मोहग्रस्त बनून गांडीव खाली ठेवतो हे गलितगात्रतेचे प्रदर्शन होते. लग्नच झाले नाही अशाचे ब्रह्मचर्य, भूकेकंगालाचे उपवास, चिंध्या पांघरणाऱ्याचा अपरिग्रह, पक्षाघात झालेल्या माणसाची स्थिरता आणि भित्र्या माणसाची अहिंसा यांचे मोल शून्य असते. मुक्या माणसाने मौनव्रत पाळल्याचे गोडवे कोणी गात नाही.



कृष्ण अर्जुनाला बरोबर ओळखतो. अर्जुनाचा कार्डियोग्राम कृष्णाला बरोबर वाचता येतो. अर्जुन केवढ्या पाण्यात आहे याची त्याला पुरती कल्पना आहे. अर्जुनाचा कार्पण्यदोष, म्हणजे दीनतेमधून उद्‌भवलेला दोष तो पाहू शकतो. पुष्कळ लोक प्रामाणिकपणे एक प्रश्न विचारतात. ''**इतकी माणसं विनाकारण मरायची त्या ऐवजी कृष्णाने अर्जुनाचे म्हणणे ऐकले असते तर काय बिघडले असते?'' असा प्रश्न करताना तीन चार हजार वर्षांपूर्वीच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीवर आजचा संदर्भ आपण ठोकून बसविण्याची चूक करीत असतो.** त्या त्या काळचे महापुरुषसुद्धा त्या काळच्या परिस्थितीपासून पूर्ण मुक्त असत नाहीत. तसे जर नसेल तर जुगारात द्रौपदीला पणाला लावणाऱ्या युधिष्ठिराला आणि द्रौपदीचे वस्त्रहरण लाचारीने पाहात राहणाऱ्या भीष्म-द्रोणांना आपण क्षमा करणार नाही. दुर्योधन द्रौपदीला आपल्या मांडीवर बसण्याकरिता भरसभेत बोलावून आणायला लावतो. ही गोष्ट, त्याकाळी आज आपल्याला जाणवते तितकी, विचित्र वाटत नसावी असे म्हणता येत नाही.

कृष्ण अर्जुनाला स्वधर्माची जाणीव करून देण्याचा प्रयत्न करतो. स्वधर्म म्हणजे सहजधर्म. अर्जुनाचा स्वधर्म म्हणजे त्याचा क्षात्रधर्म. अर्जुन याच धर्मात वाढलेला होता आणि वीर म्हणून ख्याती पावला होता. प्रश्न इतकाच आहे की त्याने गांडीव खाली ठेवले त्यात अहिंसेचा गौरव होता काय? अर्जुनाच्या ओठांवर तो शब्द शोभेल कसा? दुसऱ्या जागतिक युद्धाच्या वेळी चर्चिलने हिटलरच्या विरूद्ध म. गांधींना शोभण्यासारखे अहिंसेचे समर्थन केले असते तर? चर्चिलचा स्वधर्म हिंसेचा सामना हिंसेने करून इंग्लंडचे रक्षण करणे हा नव्हता का? डन्कर्कच्या फजीतवाड्यानंतर चेंबर्लेनच्या जागी चर्चिलला लोकांनी बसविले ते काय युद्धाच्या अनिष्टांवर भाषणे ठोकण्याकरिता? प्रत्येक माणसापुढे त्याचा स्वधर्म अचानक येऊन पडतो. स्वधर्म हा स्थळकाळांच्या परिस्थितीला धरून असतो. संधी करण्याचे सगळे प्रयत्न निष्फळ ठरल्यानंतर महाभारताचे युद्ध पांडवांवर लादण्यात आले होते. त्या काळच्या समाजाच्या सगळ्या आसुरी संपत्तीचे जणू स्मारक असे कौरव, पांडवांचे अस्तित्वसुद्धा मान्य करायला तयार नव्हते. अशावेळी क्षात्रधर्मी पांडवांनी युद्ध करायचे नाही तर काय झांजा वाजवीत बसायचे? म. गांधींनी हिटलरला पत्र लिहून मानवसंहार थांबविण्याची विनंती केली होती. म. गांधींचा तो स्वधर्म होता. चर्चिलने असे पत्र लिहिले असते तर? याच म. गांधींनी स्वराज्य मिळाल्यानंतर काश्मीरवर जेव्हा पाकिस्तानी पहाडी टोळीवाल्यांनी आक्रमण केले त्यावेळी, भारतीय फौज तिकडे रवाना करण्याला संमती नव्हती का दिली?

आयझॅक ॲसिमॉव म्हणतो त्याप्रमाणे ''हिंसा हे भित्र्या माणसाचे शेवटचे आश्रयस्थान होय.''गोष्ट अगदी खरी, पण अर्जुनाच्या तोंडी ही भाषा शोभेल? अर्जुनाने गांडीव खाली टाकले यात त्याची निव्वळ किंकर्तव्यमूढता होती.

## अर्जुन, अशोक आणि अणुबॉंब

आज कृष्ण जर फिरून आला तर त्याचे स्वरूप कसे असू शकेल? कोणत्या सामूहिक आकांक्षेची पूर्ती करण्याकरिता तो पुरुषविशेष बनून आपले अवतारकृत्य पार पाडील? आजच्या त्रस्त, ग्रस्त आणि तणावयुक्त मानवजातीला शांतीची आस आहे. आज समग्र मानवजात एक प्रकारे विषादयुक्त अवस्थेतून जात आहे. एकीकडे विज्ञान आपल्याला आनंदमय जीवनाची आशा देऊ करीत आहे तर दुसरीकडे तेच विज्ञान सर्वनाशाचा डोळा वटारून आपला थरकाप उडवीत आहे. या दोन संभाव्यतांमध्ये कृष्णाचा रथ येऊन उभा राहतो. 'सेनयोरूभयोर्मध्ये'चा संकेतसुद्धा आपण समजून घेऊ या. आजचे जग दोन शक्तीमान लष्करी गटांत विभागलेले आहे. दोन्ही महासत्ता एकमेकांविरुद्ध झगडण्याकरिता टपून बसल्या

आहेत. कुठे एखादी चकमक उडाली की दोन्ही पक्ष भडकून उठतात. लष्करी शक्तीची समीकरणे सतत मांडली जातात. दोन नबाबांचे कोंबडे झुंजावेत आणि ज्याचा कोंबडा जिंकेल त्या नबाबाने विजय साजरा करावा तशी प्रॉक्झी युद्धे आज चालली आहेत.

अर्जुनाला युद्धाच्या प्रारंभीचा विषाद उत्पन्न झाला. सम्राट अशोकाला कलिंगाच्या युद्धात विजय प्राप्त झाल्यानंतर विषाद उत्पन्न झाला. आताच्या युद्धाच्या अंती हे शक्य होणार नाही. आता युद्धाची कारणे शोधून शोधून निर्मूळ करावी लागतील. महाभारताच्या युद्धात द्रौपदी किंवा गांधारी सुरक्षित होती. आताच्या युद्धात कोणीही सुरक्षित नाही. खांडवदहनाच्या प्रसंगी कृष्णाने घंटेच्या खाली टिटवीच्या पिलांना वाचविले. आज ते शक्य नाही. अणुबाँबने होणारा विनाश संपूर्ण आणि निरपवाद असेल याची खात्री बाळगावी.

एक काळ असा होता की जेव्हा युद्धाच्या कथा रम्य मानल्या जात. जिचा लाडका युद्धात गेला असेल त्या आईला युद्धाची कथा रम्य वाटेल ? जिमी कार्टरने म्हटल्याप्रमाणे दुसऱ्या विश्वयुद्धात एकूण जितकी माणसे मेली तितकी माणसे आताच्या युद्धात दरेक सेकंदाला मरतील. आता होणारे युद्ध जगातल्या प्रत्येक मानवाला स्पर्श करणारे आहे. अर्जुनविषादयोग हा वास्तविक आपणा सर्वांचा विषादयोग आहे. युद्ध हा आपला इतिहास आहे आणि शांती हे आपले स्वप्न आहे. आताचे युद्ध हे सैनिक किंवा सरहद्दीचे प्रदेश यांच्यापुरते मर्यादित राहणारे नाही. मात्र, हेगेल सारखा दार्शनिक मानीत असे की युद्धामुळे समाज निश्चल होण्याचा थांबतो. बेकनने तर युद्धाची जॉगिंगच्या व्यायामाशी तुलना करून ते सामाजिक आरोग्याकरिता उपकारक आहे असे मानले होते. आताच्या युद्धानंतर समाज वाचला तरच त्याच्या आरोग्याचा विचार होऊ शकणार !

मायकेल कोरडाने 'Wordly Goods' नावाची एक कादंबरी लिहिली आहे, त्यात हिटलर शाकाहाराची महती वर्णन करीत असल्याचे त्याने रेखाटले आहे. या कादंबरीत पॉल फॉस्टर या पात्राच्या मुखाने कथाकाराने पुढील दोन वाक्ये बोलायला लावली आहेत.

१) वैराची वानगी ती थंड झाल्यावरच आस्वादणे चांगले.
२) वैर घेण्याचा उत्तम मार्ग म्हणजे सुंदर रीतीने जगणे.

युद्धात विषाची आणि वैराची पेरणी होत असते. त्या ऐवजी **'अवैरेंच शमे वैर, वैराने न शमेचि तें'** ही गोष्ट या कादंबरीत अत्यंत रोचक रूपात मांडलेली आहे.

माणसाच्या जीवनात विषादाचा, मथंनाचा क्षण येतो तेव्हा त्याच्या स्वधर्माची कसोटी होते. त्यावेळी तोही बापडा अर्जुनासारखा 'शोकसंविग्नमानसः' होऊन ढिला पडतो. गीता अशा वेळी स्वधर्माचा संदेश घेऊन आपल्याकडे येते. आजच्या जनसामान्याचा विषाद दूर व्हावा यासाठी कृष्णाकडून आपली अपेक्षाही वेगळी असणार. आज गांडीव खाली टाकणे हा स्वधर्म बनतो. **'पार्थास म्हणावे चढव धनुष्यावर बाण। अता रे युद्ध हेच कल्याण'** ही काव्यपंक्ती आता शिळी होऊन गेली. जगभर व्यापलेल्या विषादातून विश्वशांती प्रगटावी याकरिता कालदेवतेची हस्ताक्षरे उलगडण्याची धडपड करावी लागेल. एक लहानशी चूक समग्र मानवसंस्कृतीच उलटवून टाकील अशा धडकीखाली सतत जगणाऱ्या जगाची आस विश्वशांतीची आहे. लढण्याकरिता उतावीळ झालेल्या अर्जुनाला ही गोष्ट नव्या कृष्णाशिवाय कोण समजावू शकेल ?

## माता आणि महात्मा यात फरक या ?

पुत्राचा जन्म होतो तेव्हा वस्तुतः एका मातेचा जन्म होत असतो. एक संपूर्ण क्रांती होते तेव्हा स्त्रीतून माता प्रगट होते. स्त्री जी आहे तीच राहते, पण तिच्या अस्तित्वात फार मोठा फरक पडतो. मातेत बुद्धाची करुणा, महावीराची तितिक्षा, येशूचे प्रेम, भगीरथाची तपश्चर्या, रंतिदेवाचा त्याग आणि गांधींची सेवावृत्ती पाहायला मिळते. असे ईश्वरी गुण एकत्रितपणे आत्मसात् करणाऱ्या मातेला कोणी महात्मा का नाही म्हणत ? मातेची आसक्ती जबर असते. आपल्या मुलासाठी सर्वस्व सोडू शकणारी माता शेजाऱ्याचा मुलगा घरी आला तर आपल्या मुलाकरिता तयार ठेवलेला नास्ता बाहेर काढीत नाही. ध्रुवाच्या सावत्र आईची कथा प्रसिद्ध आहे. ध्रुव आपल्या कुशीत जन्मला नाही म्हणून तो राजाच्या मांडीवर बसू शकत नाही. ती माता करुणावान आहे, पण आपल्या सख्ख्या मुलाच्या पुरती, ध्रुवाकरिता नाही. तिचे प्रेम एके ठिकाणी साकळलेले असते (लोकलायझेशन). असे संकुचित प्रेम निरपेक्ष असत नाही. मोहाच्या योगानेच हा सगळा फरक पडतो.

महासागराच्या किनारी उभा राहून एक माणूस ओंजळ भरून पाणी घेत आहे. त्यांच्या ओंजळीतल्या पाण्यात महासागराच्या पाण्याचे सगळे गुणधर्म आहेत. ओंजळीतले पाणी सर्व प्रकारे महासागराच्या पाण्याचा नमुना (Sample) आहे. एकाच गोष्टीची उणीव आहे आणि ती म्हणजे ओंजळीला महासागराची विशालता नाही. माता ही सद्गुणांचे भांडार असली तरी महात्मा नाही बनू शकत, कारण ती आसक्तीने व मोहाने भरलेली आहे. ती आपल्या घरातला कचरा शेजाऱ्याच्या अंगणात टाकते. शेजारीण दखील तसेच करते, त्यामुळे उट्टे फिटते ! म्हणून गांधीजींनी आपल्या गीताभाष्याला **'अनासक्तियोग'** असे सुंदर शीर्षक दिले. **आसक्तीच्या योगाने अर्जुनासारखा वीर भित्र्याची भाषा बोलू लागतो.**

महाभारताची कथा, गीतेतील उपदेशाला भूमिका पुरविण्याकरिता सांगितलेली कथा आहे. गीतेचे चित्र उठून दिसावे या करिता पृष्ठभूमिका (Canvas) महाभारत पुरविते. **महाभारत हे गीतेचे पार्श्वसंगीत !** जगात कुठेही मिळणार नाही असे हे महाकाव्य आहे. धनुष्यात टणत्कार होऊन गेला आहे, पांचजन्य शंख फुंकला गेला आहे, अशावेळी युद्धाच्या मैदानावर दोन सैन्यांच्यामध्ये रथ उभा करून गीतेचा उपदेश देण्यात येतो; ही कल्पनाच विलक्षण आहे. अशी कल्पना एक व्यासच करू शकतात.



आपणा सर्वांच्या विषादाच्या मुळाशी मोह असतो. सगळे जग माझे आणि तुझे (मामका: पाण्डवा:) अशा दोन तुकड्यात विभागले जाते. टेलीव्हिजनवर दोन देशात चाललेले युद्ध दाखवण्यात येते होते. एक म्हातान्या आजी रंगात येऊन आनंदाने 'बरं झालं, बरं झालं' असे ओरडत होत्या, कारण त्यांचा स्वतःचा देश जिंकत होता आणि शत्रूचे सैनिक मरत होते. पण थोड्या वेळाने बाजी उलटली आणि शत्रूच्या सैनिकांचा जोर वाढला. आजीबाई गळाठल्या. एक तरुण मुलगा बसल्या बसल्या आजींच्या चेहऱ्याकडे पाहात होता. न राहवता त्याने विचारले, ''आजी, आतापर्यंत तुम्हाला हर्ष होत होता, आता गळाठून का गेला ?'' आजींनी उत्तर दिले ''त्यावेळी शत्रूचे सैनिक मरत होते, आता आपली माणसं मरतायत ना ?'' आसक्तीमुळे शत्रूचे सैनिक माणसाच्याही दर्जाचे राहिले नाहीत ?

## विषादातून विश्वशांती

महाभारत हे संभवतः जगातले पहिले महायुद्ध असेल. ते युद्ध एवढे महान होते की नंतर 'युद्ध' या शब्दाला पर्याय म्हणून 'महाभारत' शब्द वापरात येऊ लागला. आज देखील दोन गटात तंटा झाला तर 'महाभारत झडतंय' म्हणतात. आज कुरुक्षेत्राच्या मैदानात 'कुरुक्षेत्र युनिव्हिर्सिटी' उभी झाली आहे. खरे म्हटले तर कुरुक्षेत्राच्या मैदानावर चाललेल्या युद्धाचीच ही कथा नाही. सत् आणि असत् दैवी संपत्ती आणि आसुरी संपत्ती यांच्यामध्ये सतत चाललेल्या झगड्याची ही कथा आहे.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात जगाने दोन जागतिक युद्धे पाहिली. या महायुद्धांची व्यथा भोगल्यानंतर आणि हिरोशिमावर फेकलेल्या अणुबाँबचा छाती दडपून टाकील असा भयंकर प्रकार पाहिल्या-समजल्यानंतर गीतेचे स्मरण न झाले तरच आश्चर्य ! येथे हे ध्यानी घेणे मनोरंजक वाटेल की पहिल्या परमाणू बाँबचे नाव 'ट्रिनिटी' होते, दुसऱ्याचे **'लिट्ल बॉय'** आणि तिसऱ्याचे **'फट्मॅन'** होते. आता कॉम्प्युटरच्या सहाव्या पिढीमार्फत **'स्टार वॉर'** खेळली जाईल असा प्रसंग ओढवत आहे. आज माणसाच्या मनात जो सतत ताण आहे त्या कारणाने तो क्षणोक्षणी युद्धाचा अनुभव घेत आहे. प्रत्येक माणूस त्या ताणाचा अदृश्य भार डोक्यावर घेऊन फिरत आहे. सतत ताण अनुभवणारा माणूस दोन सैन्यांच्या मधोमध उभ्या असलेल्या रथात बसलेल्या विमूढात्मा अर्जुनासारखा आहे. 'दहा वाजून पाच मिनिटांनी' निघणारी गाडी पकडण्याच्या धोरणाने माणसे धावत सुटतात. वेग, स्पर्धा, तुलना, महत्त्वाकांक्षा आणि रोजचे रहाटगाडग्याचे जीवन आपल्याला अस्वस्थ करून टाकीत आहे. युद्धाच्या काळी शांतीचे महत्त्व लक्षात येणे, याच प्रकारे बहुधा आजच्या ताणामुळे स्वस्थतेचे महत्त्व अधिक समजेल अशी परिस्थिती आहे.

आजच्या काळी जी गर्दीची धावपळ चालू आहे आणि ज्या रीतीने मनुष्य तणावयुद्धाचा अनुभव क्षणोक्षणी घेत आहे, ते पाहता कदाचित् गीतेचा अर्जुनविषादयोग अत्यंत प्रस्तुत असा ठरतो. अर्जुनाचा विषाद आपल्याला अगदी आपलाच विषाद वाटावा इतका तो प्रामाणिक वाटतो, विषादातून विश्वशांती निर्माण होऊ शकते अशी प्रतीती आली तर ती लहानसान गोष्ट नाही. आजच्या अणु-अस्त्रामुळे काही थोड्या तासात एक अब्ज माणसे मरतील अशी परिस्थिती आहे. अतिशय चढ्या उष्णतामानाने मनुष्य एकाएकी जळून खाक होईल किंवा ज्याला 'न्युक्लियर विंटर' (अणुअस्त्र निर्मित थंडीचा मोसम) म्हणतात त्याच्या योगाने थंडीने गारठून मरेल. सारे विश्व एक महान भट्टी (गॅस चेंबर) बनेल आणि सगळे तिच्यात जळून मरतील अशी परिस्थिती आहे. त्यापुढे हिटलरची गॅसचेंबर कःपदार्थ ठरेल. निःशस्त्रीकरणाकरिता युद्धपातळीवर काम करणारी बाई डॉ. हेलन हेल्डकॉट यांनी दोन पुस्तके लिहिली

आहेत. (१) न्युक्लियर मॅडनेस् व (२) मिसाईल एनव्ही या बाई म्हणतात की आपण सगळे बुडण्यासाठी बनविलेल्या टाइटॉनिक नावाच्या मोठ्या आगबोटीत फर्स्ट क्लासचे तिकीट काढून बसलेले आहोत. यहुदी ग्रंथ तालमुद् यात म्हटले आहे की, ''जो मनुष्य एक जीव वाचवितो तो सगळे जग वाचवितो आणि जो एका जीवाची हत्या करतो तो सगळ्या जगाची हत्या करतो.'' सहजीवन की सहमृत्यू यात आपणाला निवड करायची आहे.

सारांश, महाभारतीय युद्धाला सामान्य लढाई ठरवील अशी जागतिक युद्धाच्या संभाव्यतेचा तृतीयनेत्र मनुष्यजातीला आज भिववीत आहे. महाभारत विजयाच्या अंती पांडवांनी स्वर्गारोहण केले ते सूचक आहे. युद्धात मिळालेला विजय किती कटू असू शकतो त्याची प्रतीती महाभारतातील या नाट्यात्मक शेवटाने मिळते. अतःपरच्या युद्धात कोणी जेता नसेल, केवळ कबरस्ताने असतील.

स्वधर्म हा ज्या त्या युगातील जागतिक संदर्भात पाहिला पाहिजे. आजचा स्वधर्म, युद्ध नसून विश्वशांतीकरिता प्रयत्न हाच असू शकेल. अशा नव्या स्वधर्माचा बोध जुना कृष्ण कसा देऊ शकेल ? त्या करिता 'युगेयुगे' जन्मणाऱ्या नित्यनूतन कृष्णाचे नेतृत्व आपल्याला मिळेल असा संभव आहे. आपण 'विषादयोगा'ला विश्वशांतीयोगात पालटून टाकायचे आहे.

## उपसंहार

थोरोने 'बॉल्डन' पुस्तकात 'The Pond in Winter' नावाच्या प्रकरणात गीतेविषयीचा आपला आदर खालील शब्दांत व्यक्त केला आहे.

''प्रातःकाळी भगवद्गीतेच्या भव्याद्भुत आणि ब्रह्मांडव्यापी तत्त्वविद्येत मी माझ्या बुद्धीला स्नान करायला लावतो. त्या ग्रंथाची रचना होऊन युगे उलटून गेली आहेत. या ग्रंथाशी तुलना करताना आपले आधुनिक जग आणि त्याचे साहित्य ठेंगणे नि क्षुद्र वाटते. आणि असे वाटते की या तत्त्वज्ञानाचा संबंध अस्तित्वाच्या पूर्वावस्थेशी तर नसेल ? इतकी त्याची उदात्तता आमच्या विचारांपासून दूर दूर आहे. ग्रंथ मी खाली ठेवतो आणि पाणी आणण्यासाठी माझ्या विहिरीकडे जातो. तो काय ! तिथे मला ब्रह्मा-विष्णु-इंद्रांच्या पुरोहित ब्राह्मणाचा सेवक भेटतो. तो ब्राह्मण आजही गंगेच्या काठी असलेल्या आपल्या मंदिरात बसून वेदपठन करतो, किंवा आपले भिक्षान्न व कमंडलू घेऊन एका वृक्षाच्या मुळाशी वसती करतो. त्याचा हा सेवक आपल्या गुरुकरिता पाणी काढून घ्यायला आलेला मला भेटतो आणि आमचे पोहरे एकाच विहिरीत जणू एकमेकांशी घसटतात. वॉल्डन तलावाचे शुद्ध पाणी पवित्र गंगाजलात मिसळून जाते.''

जे जरठ होऊ शकते, शिळे होऊ शकते ते कधीच कृष्ण होऊ शकणार नाही. 'गाइडेड् मिसाइल्स' (ठराविक दिशेने जाणारी अस्त्री) आणि दिशाशून्य माणसे यांच्या या जगाला आताचा कृष्ण विश्वशांतीचा आणि बंधुत्वाचाच संदेश देऊ शकणार. आता गांडीव देखील जसेच्या तसे राहिलेले नाही. गांडीवाचा विकास असा झाला आहे की खुद्द गांडीवधारी सुद्धा आता त्या गांडीवाचा टणत्कार झाल्यानंतर वाचू शकणार नाही. विषाद मात्र होता तसाच आहे. त्याचा उपाय आता तीनचार हजार वर्षांचा जुना चालणार नाही, पांडवांना स्वर्गारोहण करण्याची तरी संधी मिळाली होती. महाभारताचे सार इतकेच की विनाशाच्या अंती प्राप्त झालेला विजय सवाई विषाद उत्पन्न करतो. आता विश्वशांतीनेच विषादमुक्ती !

*(श्री. अ. ज. प्रभु यांच्या सौजन्याने)*

ooo

# माझा देवराणा

स्थिरावली माय ओसंडत पान्हा
माझा देवराणा असे साईनाथ ।।धृ।।

साईनाथ माझा आहे ऋषीकेशी
साईनाथ माझा कैलास निवासी
धरित्री आकाशी आहे जेथ तेथ
माझा देवराणा असे साईनाथ ।।१।।

साईनाथ आहे कैवल्याची खाण
साईनाथ आहे भक्तीचे उधाण
चकोराचा चंद्र आहे प्राणनाथ
माझा देवराणा असे साईनाथ ।।२।।

कृपादृष्टी झाली त्याची माझ्यावर
कशाचे राहिले आता हो उधार
राहायचे आता साईगीत गात
माझा देवराणा अस साईनाथ ।।३।।

❑ ग. के. कुलकर्णी

# हेमाडपंत विरचित गुरूमहात्म्य

— ❖ ❖ ❖ —

कै. गोविंद रघुनाथ दाभोळकर यांना साईबाबा 'हेमाडपंत' म्हणत. त्या साईभक्त हेमाडपंतानी आपल्या श्री साईसच्चरित्र पोथी मध्ये अध्याय १८ ओवी १० ते २३ मध्ये गुरू गौरव केलेला आहे. या गुरू महात्म्यपर असलेल्या ओव्या म्हणजे श्री साईमहात्म्य आहे . गुरूपौर्णिमेच्या प्रस्तुत अंकात त्या ओव्याचे भक्तासाठी मुद्दाम पुनर्प्रकाशन केले आहे. या ओव्याद्वारे भक्ताने साईगुरूंचे गौरव स्मरण करावे ही त्यामागे भूमिका आहे.

— ❖ ❖ ❖ —



न करितां बुद्धिभेद तिळभर । जैसा जयाचाअधिकार ।
तैसाच तयास मार्ग साचार । उपदेशपुर:सर दाविती ॥१०॥

ऐसें कितीएकांचे मतें । गुरूनें जे कथिलें ज्यातें ।
कथितां नये तें इतरांतें । विफल होते गुरूवाणी ॥११॥

हें तों केवळ काल्पनिक । नसतें स्तोम निरर्थक ।
प्रत्यक्ष काय स्वप्नोक्तही देख । कथिती सद्बोधक सकळांतें ॥१२॥

मानाल जरी हें अप्रमाण । बुधकौशिक ऋषि प्रमाण ।
रामरक्षा दीक्षेचें स्वप्न । केलें कथन सर्वत्रां ॥१३॥

गुरु वर्षाकाळींचे धन । आवडीं वर्षती स्वानंदजीवन ।
तें काय ठेवावें कोंबून । यथेच्छ सेवून सेववावें ॥१४॥

लेंकराची धरूनि हनुवटी । माय तयाच्या आरोग्यसाठी ।
मायाळुपणें पाजी गुटी । तीच हातवटी बाबांची ॥१५॥

मार्ग तयांचा नव्हता गुप्त । कोण्या रीतीं कैसा अवचित ।
निजभक्तांचा हेतु पुरवित । सावचित्त तें ऐका ॥१६॥

धन्य धन्य सद्‌गुरूसंगती । कोणा वर्णवे तियेची महती ।
आठवितां एकेक तयांच्या उक्ती । निजस्फूर्ति उचंबळे ॥१७॥

प्रेमें करितां ईश्वरार्चन । गुरूसेवा गुरूपूजन ।
होईल गुरूगम्य संपादन । इतर साधन तें फोल ॥१८॥

विक्षेप आणि आवरण । तेणें हा भवमार्ग संकीर्ण ।
गुरूवाक्य दीपकिरण । निर्विघ्न मार्गदर्शक ॥१९॥

गुरू प्रत्यक्ष ईश्वर । ब्रम्हा विष्णु महेश्वर ।
गुरूचि वस्तुत: परमेश्वर । ब्रम्हा परात्पर गुरूराय ॥२०॥


गुरू जननी गुरू पिता । गुरू त्राता देव कोपतां ।
गुरू कोपतां कोणी न त्राता । सदा सर्वदा जाणावें ॥२१॥

गुरू दर्शक प्रवृत्तीचा । तीर्थव्रत निवृत्तीचा ।
धर्माधर्मा विरक्तीचा । वेदश्रुतीचा प्रवक्ता ॥२२॥

उघडूनि बुद्धीचे डोळे । संत दाविती निजरूप-सोहळे ।
पुरविली भक्तीचे डोहळे । अति कोवळे कारूणिक ॥२३॥

# श्रीकृष्ण :
# भगवंतांचा पूर्णावतार

- स्वामी वरदानंद भारती




— ❖ ❖ ❖ —

परित्रायाण साधूनाम् विनाशायच दुष्कृताम् ॥
धर्मसंस्थापनार्थाय संभवामी युगे युगे ॥

**या अभिवचनाप्रमाणे भगवंताने आपल्या आठव्या कृष्णावतारमध्ये साधूंचे रक्षण, दुष्टांचे निर्दालन करण्याबरोबरच धर्मसंस्थापनेचेही कार्य केले, यामुळेच कृष्णावतारास भगवंताचा पूर्णातार म्हटले जाते.**

**कृष्णाच्या दिव्य जीवनाला अनंत पैलू आहेत. ते आकाशाप्रमाणे विशाल व सागरासारखे अथांग आहे. यामुळे त्याबद्दल गैरसमजही भरपूर आहेत. कृष्ण जीवनाबद्दलच्या आक्षेपांना, गैरसमजांना सन्मुख ठेवून कृष्णाच्या दिव्य जीवनाची गायलेली गौरवगाथा -**

— ❖ ❖ ❖ —

श्रीकृष्ण हे एक असामन्य अद्‌भुत असे व्यक्तिमत्त्व आहे. तो अवतार आहे. पण पूर्णावतार आहे. श्रीकृष्णाच्या थोरवीचे आकलन करणे ही गोष्ट अशक्यप्राय आहे. जगातील सगळ्या थोर थोर महापुरुषांची चरित्रे एकत्र केली, त्यातील मोठेपण वेगळे काढले तरी त्याने श्रीकृष्णाच्या महात्म्याला मोजण्याचे एक लहानसे मापही सिद्ध होऊ शकणार नाही. इतका भगवान मोठा आहे. त्याच्या संपूर्ण थोरवीशी तुलना करता येईल असे जगात कोठेही काहीही आढळणे शक्य नाही **''यासम हा''** एवढेच म्हणून थांबावे लागते.

महर्षी व्यासांच्या अलौकिक प्रज्ञेविषयी नितांत आदर बाळगूनही असे म्हणावे लागते की कांही वेळा तरी श्रीकृष्णाचे वर्णन करताना व्यासमहर्षींची दिव्य प्रतिभाहि स्तिमित झाली आहे. भगवान श्रीकृष्ण हे बहुआयामी (मल्टिडायमेन्शनल) व्यक्तिमत्व आहे. हे रत्न इतके तेजस्वी आहे. त्याला इतक्या विविध प्रकारचे पैलू आहेत. की त्या सगळ्यांचे यथार्थ आकलन करण्याकरिता व्यास-वाल्मिकींच्याच तोडीची योग्यता असेल तरच काहीसे साधेल. नाहीतर काजव्याने सूर्याची तेजस्विता मोजण्यास जावे तसे होईल.

श्रीकृष्ण परमात्मा आहे, परब्रम्ह आहे तेव्हां त्याच्याविषयी **''यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह''** असेच म्हणून नतमस्तक व्हावें लागेल. मी विचारासाठी श्रीकृष्णचरित्रातले प्रसंग घेताना प्रामुख्याने महाभारतातील घटना निवडणार आहे. महाभारतातील श्रीकृष्णाचे जे स्वरूप आहे ते आपणापुढे यशाशक्ती, यथामति मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

महाभारतातील श्रीकृष्ण असे म्हणतातच कुणी विचारले की ''हे काय प्रकरण आहे ?'' तुम्हीही श्रीकृष्ण दोन-चार आहेत असे मानता का ? काही संशोधकांचे तसे मत आहे. भागवतातील श्रीकृष्ण, महाभारतातील श्रीकृष्ण, महाभारतातही गीता सांगणारा श्रीकृष्ण हे निरनिराळे आहेत असे काही विद्वानांनी म्हटलेले आहे. मी मात्र तसे मुळीच मानीत नाही. गोकुळातला, गोपांच्या बरोबर खेळणारा, गोपिकांच्या अतिउत्कट प्रेमाचा विषय झालेला, पूतना अघासुरांना मारणारा, कालियाचा विषारी फणा पायदळी तुडवित नृत्य करणारा, कंसचाणूरांचा वध करणारा, युद्ध करणार नाही अशा भूमिकांवर कर्तव्यविन्मुख होणाऱ्या अर्जुनाा पुनः कर्तव्यपरायण करण्यासाठी सर्व मानवजातीला सर्वकाळी मार्गदर्शक आणि बोधप्रद होईल असा गीतांसारखा दिव्योदात्त उपदेश करणारा, निकटसमयी द्रौपदीचे रक्षण करणारा, पांडवांच्या पाठीशी सातत्याने उभा राहणारा आणि अंतर्गत दोषामुळे अपरिहार्य झालेला यादवाचा संहार तटस्थपणे पाहणारा श्रीकृष्ण, भगवान श्रीकृष्ण एकच आहे. असे माझे

निश्चित मत आहे. कारण वस्तुस्थितीच तशी आहे याविषयी मला लवमात्र शंका नाही.

परंतु श्रीकृष्ण जेव्हा यथार्थरीतीने संपूर्णपणे समजून घेण्याची इच्छा असते. तेव्हा मात्र आपल्या मर्यादांचे भान ठेवून श्रीकृष्णाला निरनिराळ्या अ गांनी वेगवेगळे समजून घेणे सोयीचे म्हणून उपयुक्त ठरते.

गीता सांगणरा योगेश्वर श्रीकृष्ण, भक्तांचा श्रीकृष्ण, त्यातही गोपांचा सवंगडी श्रीकृष्ण, यशोदानंदवर्धन असलेला बाळकृष्ण, गोपिकांच्या प्रेमाचा अनन्यविषय असलेला श्रीकृष्ण सज्जनांच्या संरक्षणासाठी कंसशिशुपालादिक, दुष्टांचा वध करणारा श्रीकृष्ण, धर्मस्थापनेसाठी पांडवांच्या पाठीशी उभा राहणारा श्रीकृष्ण, त्यासाठी आपल्या प्रज्ञेच्या तेजस्वीतेने अलौकिक बुद्धिमत्तेने कोणत्याही प्रसंगावर चातुर्याने दक्षतेने मात करीत, विलोभनी ऐश्वर्याने तळपणारा असा महाभारताचा अधिनायक श्रीकृष्ण हे एकाच परमेश्वररूप श्रीकृष्णाचे विविध पैलू आहेत. त्यात क्वचित् परस्पर विसंगतीही भासते. पण ती अगदी वरवरची असते. मुळाशी जाऊन शोध घेतला, भूमिका हेतू, उद्दिष्ट जाणून घेतले की मग कृष्णाच्या वर्तनात दिसून येणारे हे सर्व विशेष, हे वैविध्य त्याच्या ''परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम्। धर्मसंस्थापनार्थाय'' असलेल्या अवतारकृत्याशी पूर्णपणे सुसंगत आहे असेच प्रत्ययाला येते.

आपल्या भारतीय संस्कृतीवर ज्या दोन व्यक्तिमृवांचा प्रभाव आहे, आसेतुहिमाचल पसरलेला, भाषा, पंथ, रीतीभाती यांच्या विविधतेने भरल ला भारतवर्ष, ज्यादोन व्यक्तिमत्त्वाच्या महात्म्यामुळे धार्मिक बांधला गेल्यासारखा अभंग राहिला आहे, स्वार्थी राजकारण्यांच्या सगळ्या चाल्यांवर मात करूनही त्याची आंतरिक एकात्मता अद्यापही जिवंत आहे. ती दोन व्यक्तिमत्वे आहेत, **श्रीराम** आणि **श्रीकृष्ण!**

भगवान् श्रीराम आणि भगवान् श्रीकृष्ण या दोन परमेश्वरस्वरूप महापुरुषांनी सर्व प्रकारच्या विविधतेवर, भेदावर मात करूनही आमची हृदये सहस्त्रवधि वर्षे एकमेकांशी घट्ट बांधून ठेवली आहेत. म्हणून आम्ही अद्यापही सर्व प्रकारच्या आपत्तींना तोंड देत एक राष्ट्र म्हणून जिवंत आहोत. आसेतु हिमाचल भारतवर्ष जसा प्राचीनकाळी होता तसा आजही आहे. श्रीराम-श्रीकृष्णाची महती एका समाजवादी पुढाऱ्यानेही भावनोत्कटरीतीने गौरवपूर्ण शब्दांत गायिली आहे.

श्रीराम आणि श्रीकृष्ण यांच्या व्यक्तिमत्त्वाची तुलना करून त्यात उणेअधिक ठरविणे. तत्त्वतः अगदी अशक्य आहे. दोघेही हिंदू समाजाच्या प्रेमादराचा विषय आहेत. हा प्रेमादर भावपूर्ण आहे, उत्कट आहे. त्यात सूक्ष्मरीतीने अंतर दाखवावयाचेच झाल्यास **श्रीरामाविषयी आदर अधिक तर श्रीकृष्णाविषयी प्रेम अधिक असे म्हणता येईल.** काही झाले तरी प्रभू रामचंद्र सिंहासनाधीश राजाधिराज आहेत. **श्रीकृष्णानी सिंहास जाणीवपूर्वक नाकारले आहे.** यादवांचे तर गणराज्यच होते. त्या गणराज्याचे अधिकृत नेतृत्व उग्रेसन, वसुदेव, बलराम यांचेकडे होते. **श्रीकृष्णाने कोणतेही सत्तेचे पद कधीही स्वीकारलेले नाही.** श्रीकृष्ण गोपाल आहे. गीपीजनवल्लभ आहे. त्याने अर्जुनाचे सारथ्य केले. व्यावहारिक जगातले सिंहासन श्रीकृष्णाने आवर्जुन नाकारले असले तरी लोकांनी आपल्या हृदयसिंहासनावर श्रीकृष्णाला बसविले आणि सहस्त्रकामागून सहस्त्रके लोटली तरी श्रीकृष्णाचे सिंहासन तसे अविचल आहे. आणि दूरदूरच्या भविष्यकालतही ते तसे अविचल राहणार आहे.

भगवान् श्रीकृष्णाला लोकांनी त्याच्या सर्व चरित्रासह अत्यंत प्रेमाने, भावभक्तीने स्वीकारले आहे. राधाकृष्णांचे प्रेम हा काही थोड्यांच्या आक्षेपांचा विषय आहे. रासक्रीडेकडेही काही जण काहीशा कुत्सित दृष्टीने पाहतात. पण नव्याण्णव प्रतिशतांच्या अंतःकरणात तरी राधाकृष्णांच्या प्रेमासंबंधी कोणताही विकल्प नाही. उलट भावजगतामध्ये राधेविषयीचा प्रेमादर, रुक्मिणीपेक्षा काकणभर अधिकच आहे. **राधेश्याम** किंवा **राधाकृष्ण** या युगुल नामाच्या भजनगजरात देहभान विसरून जाणाऱ्या भाविकांची संख्या आश्चर्याने थक्क व्हावी इतकी प्रचंड आहे. सुदूर दक्षिणेकडील त्रिवेंद्रम या नगरीत एका मंदिरात राधेची मूर्ती बसविलेली आहे. श्रीचैतन्य महाप्रभूंना असंख्य भाविकांकडून राधेचा अवतार मानले जाते.

### रासक्रिडेबद्दल गैरसमज

रासलीलेसंबंधीही तसेच म्हणता येईल. गोपीच्या प्रेमाच्या उत्कटतेचा तो सहज आविष्कार आहे. शब्दरचना शृंगारिक वाटली तरी या शृंगाराला वस्तुतः कामासक्तीचा स्पर्शही नाही. वरवर पाहता तो व्यभिचार वाटतो पण शुकाचार्यांसारख्या विरक्तांच्या मुकुटमण्याने मोठ्या प्रेमाने तो वर्णिला आहे. संतमहात्म्यांनी या व्यभिचाराला दिव्य आणि धन्य अशी विशेषण दिली आहेत. श्रीज्ञानेश्वरमहाराजांसारख्या सोज्वल चरित्र असलेल्या योगयोगेश्वरांनी, माऊलींचे अंतःकरण असलेल्या वात्सल्यमूर्ती संतश्रेष्ठांनी भक्तांच्या प्रेमाचे वर्णन करताना, ''तो वल्लभा मी कांतु। ऐसा पढिये।.'' याच शब्दांनी केले आहे. तेव्हा रासक्रिडेसंबंधी काही विकल्प बाळगण्यापूर्वी श्रीशुकाचार्य, ज्ञानेश्वर, इतर संतमहात्मे यांची भूमिका विसरून चालणार नाही.

भक्तीच्या उत्कटतेची परिभाषा ज्यांना समजत नाही, त्यांना तर रासक्रिडेवर आक्षेप घेताच येणार नाही. कारण रासलीला हा प्रसंग गोकुळात घडलेला आहे. त्यावेळी भगवंताचे वय सात किंवा आठ वर्षाचे आहे. आणि हे वर्णन पाचभौतिक देहाला

अनुलक्षून नाही, असे भागवतातील रासपंचाध्यायीतील शेवटी शेवटी आलेल्या वर्णनावरून स्पष्ट होते. गोपिका त्यावेळी स्वतःच्या घरी आपल्या पतींच्या सहवासात होत्या. असा स्पष्ट उल्लेख भागवतकारांनी केला आहे. तेव्हा स्वतःला बुद्धिवादी म्हणविणाऱ्यांना तरी रासक्रीडेवर कोणताही आक्षेप घेणे शक्य नाही.

गोपी आणि कृष्ण यांचे प्रेम किंवा राधा आणि कृष्ण यांचे प्रेम हे समाजमान्य स्वरूपाचे नव्हते, शुद्ध नव्हते, नीतीला धरून नव्हते. असे महाभारतकाळी तरी मानले जात नव्हते. कारण द्रौपदीने सभेमध्ये होणाऱ्या तिच्या विटंबनेतून स्वतःला वाचवावे म्हणून श्रीकृष्णाचा जो धावा केला, त्यात श्रीकृष्णाला 'गोपीजनप्रिय'' हे संबोधन दिले आहे. गोपीचे कृष्णप्रेम अनैतिक आहे असे वाटले असते तर स्वतःच्या लज्जारक्षणासाठी धावून ये. असा धावा करीत असताना द्रौपदीने कृष्णाला 'गोपीजनप्रिय'' हे संबोधन वापरलेच नसते.

राजसूय यज्ञाच्या वेळी श्रीकृष्णाला अग्रपूजेचा मान दिला म्हणून संतापलेल्या मत्सरी शिशुपालाने कृष्णाची नानाप्रकारे निंदा केली आहे. त्याचे गोकुळातले बालपण लक्षात घेऊन त्याला गवळी म्हणून तिरस्कारिले आहे. गोपींचे कृष्णावरील प्रेम वासनामय असते तर शिशुपालाने त्याचा लाभ घेऊन तसा उल्लेख करून कृष्णाची अधिकच निंदा केली असती. पण शिशुपालाने कोणत्याही संदर्भात या गोपीप्रेमाचा उल्लेख केलेला नाही. तेव्हा हे प्रेम वरवर वर्णनाने वाटते तसे नीतीला सोडून नव्हते. तसे गृहित धरून परिक्षितीनेही शुकाचार्यांना प्रत्यक्षपणे शंका विचारली आहे. शुकाचार्यांनी त्यांचे उत्तर निराळ्या रीतीने दिले आहे. ते, 'वैद्य सांगतो ते खावे, वैद्य खातो ते खाऊ नये.'' या स्वरूपाचे आहे. त्यालाही एकादृष्टीने महत्त्व आहे. पण त्याविषयाचे विवेचन करावयाचे ठरविले तर फार विस्तार करावा लागेल. परिक्षितीने विचारलेल्या शंकेमुळे श्रद्धाहीनांना संशय घेण्यास वाव राहिला हे मात्र खरे.

जाता जाता, भागवतात राधेचा उल्लेखच नाही. त्यामुळे राधा ही कुणी ऐतिहासिक व्यक्ती नाही असेही मत काही विद्वजनांनी मांडले आहे. पण ते योग्य नाही. राधा हे नाव भागवतात आलेले नसले तरी ते ज्या स्वरूपाच्या व्यक्तिमत्वाचे संभवते त्याला साजेशा व्यक्तीचा गोपी या साधारण नावाने केलेला उल्लेख भागवतात आहे. तदनुकूल अशी एक घटनाही तेथे सांगितली आहे. तेव्हा राधा ही व्यक्ती काल्पनिक आहे हे म्हणणे योग्य नाही. राधेचे नाव पद्मपुराणात तर स्पष्टपणे आले आहे.

श्रीकृष्ण जीवनातील एकेका घटनेचा, एकेका अंगाचा विचार केला तर त्यात वरवर पाहता विसंगती जाणवते हे खरे पण महापुरुषांची दिव्योदात्त चरित्रे अशी उथळपणे पाहून चालत नाहीत. श्रीकृष्णासंबंधीही तेच लक्षात ठेवले पाहिजे. भगवान श्रीकृष्णाने संगति-विसंगती, स्वैरता आणि सन्नीती यांचा उपयोग आपल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी साधने म्हणून केला आहे आणि हे उद्दिष्ट स्वार्थसाधनेचे नाही. ते सर्वांच्या कल्याणाचे, सर्वांच्या हिताचे, सर्वांच्या मांगल्याचे आहे. आपल्या भक्तांच्यासाठी श्रीकृष्णाने सगळ्या मर्यादांचे उल्लंघन केले आहे. धर्माची संस्थापना करण्यासाठी राजकारणे अशा दक्षतेने आणि चातुर्याने केली आहेत की ज्यामुळे सज्जनांच्या सौजन्याचा लाभ घेऊन दुर्जन विजयाचा उन्माद मिळवू शकणार नाही. असामान्य कर्तृत्वाचे अद्भूत चमत्कार श्रीकृष्णाने वेळोवेळी अशा कौशल्याने दाखविले आहेत की त्याच्या संबंधांत जे जे काही बोलावे ते ते शोभूनच दिसते. गौरवाचेच ठरते.

एक विशिष्ट राजकारण साधण्याच्या हेतूने, भगवान एकदा ज्या जरासंधाचा पराभव त्यानी अनेकवेळा केला होता, त्याला चुकविण्यासाठी मथुरेहून द्वारकेला पळून आले. पण त्यामुळे त्यांना प्राप्त झालेले ''रणछोड'' हे नाव कौतुकाने स्तुतिवाचक होऊन भक्तजनांना प्रिय झाले. डाकूर येथील श्रीकृष्णाचे मंदिर रणछोड भगवंताचे मंदिर म्हणूनच प्रसिद्ध आहे. आमच्या ती दादानीही (श्रीदासगणुमहाराजांनी) एका भजनात श्रीकृष्णाचे उल्लेख **''सुणअर्जी रणछोड रे। सुण स्वामिन् रणछोड''** असाच केला आहे. यात प्रेमभाव आहे, आदरयुक्त भक्ती आहे. येथे विनोद नाही, कुत्सितपणा तर नाहीच नाही.

व्हॅलेंटाइन चिरोलने लोकमान्य टिळकांची अवहेलना करण्याच्या दृष्टीने त्यांना ''भारतीय असंतोषाचे जनक'' (फादर ऑफ दि इंडियन अनरेस्ट) म्हटले. पण ते त्यावेळच्या परिस्थितीला अनुसरून टिळकांनी केलेल्या कर्तृत्वाचे यथायोग्य मूल्यमापन करणारे गौरवास्पद विशेषण ठरले. श्रीकृष्णाच्या चरित्रातील प्रसंगाला उद्देशून जे काही म्हणावे, ते कसे भूषणाचे ठरते ते लक्षात आणून देण्यासाठी मी हे उदाहरण सांगितले.

श्रीकृष्ण भारतवर्षात अवतीर्ण झाले, त्याला सहस्त्रावधि वर्षे लोटली. पण त्यांच्या या लोकप्रियतेमध्ये यत्किंचितहि घट झालेली नाही, उलट महानदीच्या प्रवाहाप्रमाणें ती लोकप्रियता अधिकाधिक वाढतेच आहे. आता तर तिने देशाच्या सर्व सीमा ओलांडून परदेशातील जनतेलाहि प्रभावित करण्यास आरंभ केला आहे.

ज्याने जनतेच्या हृदयसिंहासनावर आपले साम्राज्य अखंडपणे प्रस्थापित केले आहे तो भगवान् श्रीकृष्ण आहे तरी कसा त्याचे अधिराज्य जनमानसावर इतक्या आश्चर्यकारक रितीने कशामुळे टिकून राहिले आहे, हे सर्वांगाने जाणून घेणे अत्यंत इष्ट आहे. आपल्या सर्वांगिण प्रगतीचा, विकासाचा, उन्नतीचा मार्ग त्यामुळे स्पष्ट होणार आहे. प्रतिकूल

परिस्थितीला धैर्याने तोंड देत इष्ट त्या दिशेने वाटचाल करण्याची प्रेरणाहि त्यामुळे आपल्याला लाभणार आहे.

श्रीकृष्णाचे चरित्र अनेकांनी गायिले आहे. भक्तांनी गोपीजनप्रिय, गोकुलानंदवर्धन, नंदनंदन श्रीकृष्णाचे वर्णन करण्यात आपल्या प्रतिभेचे सारे वैशिष्ट्य प्रगट केले आहे. तेथे शब्दसंपत्ति वेचण्यात धन्यता मानली आहे. आपल्याकडे एक संप्रदाय असा आहे की तो बालकृष्णाला आपले आराध्यदैवत मानतो. गोकुळातील श्रीकृष्णाची बाललीला गाण्यातच त्याला धन्यता वाटते. इतकेच नव्हे तर कधी कधी श्रीकृष्ण गोकुळाच्या बाहेर पडला आणि बिघडला असेहि तेथे विनोदाने म्हटले जाते.

भक्तांच्या रक्षणासाठी श्रीकृष्ण अत्यंत तत्पर असतात हे गोकुळात घडलेल्या दावानलाचे प्राशन, गोवर्धनोध्दारण या प्रसंगातून भक्तिप्रेमाने सविस्तरपणे वर्णिले जाते. द्यूतप्रसंगी अधमांच्या पाशात सांपडलेल्या द्रौपदीच्या लज्जारक्षणासाठी श्रीकृष्णाने अनंत वस्त्रें पुरविली. ती ओढता ओढता दु:शासन थकून कोसळला. ही कथाहि हरिदासांनी कीर्तनसमयी वारंवार गायिली आहे. द्रौपदीच्या थाळीला चिकटलेले भाजीचे पान खाऊन शीघ्रकोपी दुर्वासाच्या भयातून द्रौपदीला आणि पांडवांना श्रीकृष्णाने सोडविले. ही कथाहि सर्वांना ठाऊक आहे. दुष्ट अश्वत्थाम्याने उत्तरेच्या गर्भावर ब्रम्हास्त्राचा प्रयोग करून पांडवांचा निर्वंश करण्याचे मानवजातीला लाज आणणारे अधम कृत्य श्रीकृष्णाने प्रतिज्ञापूर्वक विफल केले. परिक्षितीला जिवंत केले. हे आख्यानहि प्रसिद्ध आहे.

गीतेच्या माध्यामातून तत्त्वज्ञानी श्रीकृष्णहि थोरथोर महाभागानी, विद्वानानी पंडितानी शिरोधार्य मानलेला आहे. ज्यांची मते परस्परांपेक्षा वेगळी आहेत, एकमेकांच्या विरोधी आहेत, अशा श्रीशंकराचार्य, श्रीरामानुज, श्रीवल्लभ, श्रीमाध्वाचार्य, श्रीनिंबार्क, अलीकडचे श्री.लोकमान्य टिळक महात्मा गांधी, अशा तत्त्ववेत्यांनी आपल्या सिद्धांताच्या प्रस्थापनेसाठी श्रीकृष्णाने सांगितलेल्याच गीतेचा आधार घेतला आहे.

*('श्रीकृष्ण : एकदर्शन'मधून)*

OOO

# कृष्ण जीवन एक चमत्कार

श्रीकृष्ण आणि महावीर-बुद्ध यांच्यामध्ये खूपच फरक आहे. महावीर व बुद्ध यांच्या जीवनात साधक ते सिद्धीवस्था असा प्रवास आहे. 'ग्रॅज्युअल एन्लाइटेनमेंट' आहे. पण कृष्ण हा जन्मत:च सिद्ध आहे. तो साधकाचा सिद्ध झालेला नाही हे लक्षात घेणे महत्वाचे आहे. श्रीकृष्ण जीवन म्हणजे 'सडन एन्लाइटेनमेंट' आहे. महावीर-बुद्ध यांची पद्धती 'साधना' आहे तर श्रीकृष्णाची पद्धती केवळ 'स्मरण रिमेम्बरींग' आहे. श्रीकृष्णाने अमूक तप केले अमूक साधना केली. अमूक जंगलात एकांतात तप:श्चर्या केली असे आपणास आढळत नाही ते त्याच्या जन्मत:च सिद्धावस्थेमुळे

श्रीकृष्णाचे जीवन तुम्हाला, स्वत: स्वत:ला ओळखण्यास सांगते. आत्मविस्मृतीतून स्वत:चे आत्मभान घडविते. स्वत:ला ओळखा एवढाच संदेश देते. मेंढरांच्या कळपात वाढलेल्या सिंव्हाच्या छाव्याला आपण सिंव्ह आहोत याची विस्मृती झालेली असते व तो मेंढरांच्या कोकरा सारखे बें..बें.. करीत असतो. त्याला सिंव्ह होण्यात 'ग्रॅज्युअल एन्लाइटेनमेंट' ची नव्हे तर 'सडन एन्लाइटेनमेंट' ची गरज असते. त्याला पाण्यात आपले प्रतिबिंब पाहून स्वत:ची ओळख होते. तशीच आपणास श्रीकृष्ण रुपी आरश्यामध्ये आपले प्रतिबिंब पाहून आत्मभान होण्याची गरज आहे.

गीतेमध्ये श्रीकृष्ण अर्जुनाला वेगवेगळ्या पद्धतीने केवळ 'तू स्वत:ला ओळख' 'तुझे तुला आत्मभान होऊ दे' एवढेच सांगतो. अन्य काहीही उपदेश करीत नाही.

श्रीकृष्णाचे एकूण जीवनचरित्र एक पॉझिटीव्ह जीवन आहे. विधायक जीवन आहे. कोणत्याही गोष्टीचा त्यांच्या जीवनात अस्विकार-विरोध नाही. श्रीकृष्णाचे जीवन बहु-आयामी, बहुमुखी आहे. अनेक असंभव घटनांनी ते भरलेले आहे. आणि असंभव घटना घडणे म्हणजेच चमत्कार. म्हणून कृष्णजीवन अनेक चमत्कारांनी भरलेले आहे.

श्रीकृष्णाचे वैशिष्ट्य म्हणजे कृष्ण सोडून सर्वच महापुरुषांनी जगातील पृथ्वीवरील जीवनाला मिथ्या मानून स्वर्गातील मोक्ष महत्वाचा मानला. महावीर, बुद्ध आणि येशू खिस्त या सर्वांनीच जीवन दु:ख मानले आहे व मोक्ष-मुक्तीलाच परमानंद मानले आहे. केवळ श्रीकृष्णाने येथील जीवन आनंददायक असल्याचे मानले आहे. स्वत: नाचून - गाऊन-बासरी वाजवून -डोक्यावर मोरपिस लावून तो एखाद्या आनंदयात्री सारखे येथील समग्र जीवनाचा स्वीकार आनंदाने करतो. महावीर-बुद्ध-येशू यांचा मोक्ष आनंद पृथ्वीपासून दूर स्वर्गात जाण्यात आहे तर श्रीकृष्ण पृथ्वीवर आनंदाने जगण्यात मोक्ष असल्याचे दाखवून देतो. यामुळे आजच्या स्थितीत व भविष्यात केवळ कृष्णाचा दृष्टिकोनच स्वीकार्य होऊ शकतो- श्रीकृष्ण सुसंगत ठरतो व बाकी सर्वच जण कालबाह्य ठरतात.

# कृष्णलीलाचे शब्दरूपदर्शन
# नाथ भागवत

– के. वि. बेलसरे

— ❖ ❖ ❖ —

**संत एकनाथांनी संस्कृतमधील भागवत ग्रंथावर मराठीत टीका लिहून एक अद्वितीय मराठी ग्रंथ निर्माण केला. या ग्रंथाची काशीमध्ये पंडीतांनी हत्तीवरून मिरवणूक काढली. अशा या ग्रंथास 'नाथ भागवत' म्हणून ओळखले जाते. त्या ग्रंथातील काही भागावरील संक्षिप्त निरसण**

— ❖ ❖ ❖ —

श्रीमद्भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायात ज्याप्रमाणे संबंध गीतेच्या तत्त्वज्ञानाची रूपरेषा थोडक्यात आढळते, त्याचप्रमाणे नाथ भागवताच्या दुसऱ्या अध्यायात संबंध एकादशस्कंधाच्या तत्त्वज्ञानाचे म्हणजेच भागवत धर्माचे तात्पर्य सांगितलेले आढळते. कळत वा नकळत प्रत्येक माणूस आपल्या हितासाठी धडपडत असतो. पण आपले खरे हित म्हणजे आपले आत्यंतिक क्षेम कशात आहे याची कल्पना नसल्याने मनुष्य तात्पुरत्या ध्येयाच्या पाठीमागे लागतो. ती ध्येये साध्य झाली तरी खरी शांती न लाभल्याने त्यांचे आयुष्य वाया जाते. आत्मज्ञानात माणसांचे खरे कल्याण आहे व ते ज्ञान करून घेण्यास भक्ती हीच सर्वोत्तम मार्ग आहे असे नाथांचे स्पष्ट मत आहे. आत्मज्ञान हे साध्य आणि भक्ती हे साधन मिळून जे अध्यात्मशास्त्र बनते त्यास भागवतधर्म असे नाथ म्हणतात. प्रपंचाची घडी न बिघडवता परमार्थ साधायला हवा असा नाथांचा कटाक्ष असून, देही असून विदेहीपणाने वागणे, प्रपंचात राहून उत्कृष्ट शांती अनुभवणे, निष्कामवृत्तीने कर्तव्याचरण करणे ही ज्ञानी पुरुषांची लक्षणे सविस्तर वर्णिली आहेत. **भक्ती म्हणजे भगवंतावर खरे व निःस्वार्थी प्रेम, मन, वाणी, कर्म आणि मीपणा भगवंताला अर्पण करणे हा भक्तीचा प्राण होय. भक्तीने सहज समाधी साधते.** भक्ती, विरक्ती आणि अपरोक्षानुभूती ही सहज समाधीची तीन अंगे असून भक्ताला स्वतःमध्ये आणि जगामध्ये परमात्मा भरलेला अनुभवास येतो. समूळ देहाभिमान झाडून, नामस्मरणाने निष्कामवृत्ती साध्य करून भगवंताच्या चरणी लीन होणे ही भक्ताची साधना होय. भक्ती साधण्यास संतांचा सहवास अवश्य असतो कारण त्यांच्या आचरणात ती सहजपणे प्रकट होते.

### श्रीसद्गुरू 'मायबाप'

संतांच्या दृष्टीने सद्गुरू म्हणजे निर्गुण परमात्म्यांचे सगुणरूप होय. सद्गुरूचे वर्णन म्हणजे अपरोक्षानुभवांचेच वर्णन असते. म्हणून सद्गुरूच्या वर्णनात ज्ञानी पुरुषाला आलेल्या अनेक सूक्ष्म, व्यापक आणि मनोवाचातीत आध्यात्मिक अनुभवांचे भांडार भरलेले असते. भगवंताचे अनुभव सामान्य मनुष्यास समजावून सांगण्यास त्याच्या जीवनातील एखादा सदृश अनुभव वापरावा लागतो. अर्थात् संतांनी केलेली सद्गुरुची वर्णने रुपकात्मक असतात. या ठिकाणी आईबापांचे रूपके वापरून नाथांनी आत्मस्वरुपाच्या दर्शनांचे चित्र काढले आहे.

**नाथ म्हणतात** : देवांचा देव असणाऱ्या परमात्मस्वरूपाचा जयजयकार असो. सद्गुरुच्या रूपाने तोच परमात्मा मोठा शोभिवंत दिसतो. सद्गुरू जेव्हा कृपेने आपल्याकडे पाहतात तेव्हा विश्वामध्ये अंतर्यामीपणाने भरून राहिलेला विश्वात्मा अनुभवास येतो. **विश्वामध्ये परमात्मा भरलेला आहे. अशी खात्री असणे याचे नाव विश्वास होय.** हा विश्वास ज्याच्यापाशी असतो त्याच्यावर सद्गुरू प्रसन्न होतात आणि त्याला स्वतःच्या पायापाशी प्रवेश देतात. त्या पायांच्या कृपादृष्टीने माझ्या अहं-सोऽहंच्या गाठी सुटल्या (म्हणजे देहबुद्धी व आत्मबुद्धी दोन्ही नाहीशा झाल्या) आणि पाहता पाहता मी सद्गुरुच्या पोटात शिरलो (म्हणजे मी परमात्म्याशी एकरूप झालो) म्हणून सद्गुरू माझी आई आहे. पण आई म्हणून त्यांना पाहायला गेलो तर त्यांच्या ठिकाणी बापपणादेखील आढळला हे आश्चर्य. व्यवहारात आई आणि बाप वेगवेगळे असतात. पण सद्गुरू श्रीजनार्दनांच्या ठिकाणी दोन्ही एकत्र आले असून मी त्यांचे तान्हे लेकरू झालो. आई व बाप या दोघांच्या प्रेमाने ते मला वाढवीत आहेत. म्हणून रोज आत्मज्ञानाचा नित्य नवा आनंद मला अनुभवास येतो. शिव, शक्ती, गणेश, विश्व, सूर्य असे अनेक अलंकार ते स्वतःआपल्या हौसेनेच मला घालतात (म्हणजे आत्मसत्तेने अशी अनेक रूपे मी धारण करतो) आपल्या लेकराला अर्थात् मला स्वतःच्या हौसेसाठी ते अलंकार घालतात आणि तो

सोहळा मोठ्या प्रेमदृष्टींने स्वतः तेच पाहतात. लहान मुलाच्या अंगावर दागिने घातले तर त्याला त्यांचे सुख नसते. त्याची आई ते सुख भोगते. त्याचप्रमाणे माझ्या दिव्य अवस्थांचे सुख माझे सद्गुरू भोगतात. स्वतःच्या चिद्रत्नांच्या माळा जनार्दनस्वामींचे मोठ्या आवडीने माझ्या गळ्यात घातल्या (म्हणजे स्वतःचे अपरोक्षानुभव माझ्या अनुभवास आणून दिले) आणि मग ते मला सांभाळण्यासाठी आपलेपणाने माझ्या पाठोपाठ धावत आहेत. (म्हणजे आत्मैक्याने माझ्याशी त्यांचा अखंड सहवास आहे.) थोर बापाच्या मुलाला सर्व लोक मानतात. त्याचप्रमाणे जनार्दन स्वामींनी मला आपले म्हटले म्हणून मी अपात्र असूनदेखील मान्यता पावलो. लहान मुलाला बोलायला येत नसते. आई त्यास बोलायला शिकवते. तसे स्वामी स्वतः हा ग्रंथ माझ्याकडून बोलवीत आहेत. माझ्यासारख्या मूर्खाच्या तोंडून भागवताच्या अकराव्या स्कंधाच्या अर्थ मराठीमधून बोलविला हा त्यांचा केवढा चमत्कार आहे.



त्याला सायुज्यपर्यंत पोचवतात. संसाररूपी सागर एवढा प्रचंड खरा, पण संतांच्या साहाय्याने तो सहज उल्लंघून जाता येते. भागवतधर्माच्या आचरणाने हा सागर नुसत्या पायांनीच तरून जाऊन पैलतीराला पोचता येते. संत स्वतः भागवतधर्माचे आचरण करून तृप्त असतात, पण त्याबद्दल जिज्ञासेने कोणी प्रश्न विचारल्यास त्यांना विशेष प्रसन्नता वाटते. नारदांचे असेच झाले. ''मला भागवतधर्म समजावून द्या'' असे वासुदेवाने विचारल्यावर त्यांना आनंदाचे भरते आले. मनाला मन मिळाल्याने त्यांचा आत्मानंद भरून आला. त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले, अंगाला घाम सुटला, डोळ्यांतून आनंदाश्रु वाहू लागले व ते स्वानंदाच्या रंगांत डोलू लागले. बरोबरच आहे. प्रेमळ श्रोता मिळाला असता ज्या वक्त्याला पूर्ण आनंद होत नाही त्याला त्या विषयाची रसिकता नाही. तो अगदी कोरडा आहे असे समजावे. तात्पर्य, नारद मोठ्या आनंदाने आणि मोकळेपणाने वसुदेवाला अध्यात्मज्ञान सांगू लागले.

## संत भागवतधर्माचे द्रष्टे :

भगवंताकडे जाण्याचे अनंत मार्ग आहेत. पण सर्व काली, सर्व ठिकाणी, सर्व परिस्थितीमध्ये, सर्व पातळीवरील माणसांना सहज आचरता येण्यासारखा मार्ग एकच आहे. तो म्हणजे भागवतधर्म होय. संत स्वतः त्यांचे आचरण करतात, भगवंतापर्यंत पोचतात आणि मगच लोकांना त्याचा उपदेश करतात.

संत भागवतधर्माच्या मार्गाने जातात. परमानंद साध्य करून देणारा भागवतधर्म समजावून सांगणारा संत भेटणे मोठे भाग्याचे असते. भागवतधर्माचे अंतरंग भक्तीने भरलेले असल्यामुळे संतांनी भक्तीचा महिमा वाढविला. भक्तीला त्यांनी भगवत्स्वरूप बनविली आणि तिचे सामर्थ्य वाढविले. म्हणून संत म्हणजे भक्तीला प्रकाशित करणारी मशाल होय. संत हा भक्तीमार्गाचा वाटाड्या असतो. संतांचे उपकार कसे वर्णन करावे ! दीन जनांसाठी त्यांनी भक्तीच्या पेठा वसवून टाकल्या. म्हणून संतांच्या कृपेची लहर हे दीन जनांच्या विश्रांतीचे स्थान आहे. त्यांचा राग वरवरचा असतो. ज्याच्यावर ते रागावतात, त्याचे पापच नाहीसे करतात आणि शेवटी आत्मदर्शन करवून

## संत देवापेक्षा श्रेष्ठ

देव आणि संत एकरूप असून भिन्न असतात. देव हा बापासारखा तर संत हे आईसारखे वागतात. देवाजवळ न्यायीपणा आहे. जसा भाव तसा देव शिवाय, जसे करावे तसे भरावे या नियमांमध्ये देव ढवळाढवळ करीत नाही. पण संतांची वागण्याची तऱ्हा निराळी. भाव असो नसो, संत नेहमी आपलाच असतो. भाव असेल त्याला संत तारीलच. पण ज्याच्यापाशी भाव नसेल त्याच्या ठिकाणी तो उत्पन्न करून संत त्याला तारील. म्हणून अभवाने जगणाऱ्या सामान्य माणसाला हरप्रयत्नाने सद्भाव उत्पन्न करून उद्धार करणारे संत देवापेक्षा अधिक जवळचे वाटतात.

**संतांना देवासमान मानणे हे देखील गौणच आहे.** या सृष्टीमधील जीवांना देवापासून सुखदुःखे भोगावी लागतात. अतिवृष्टी किंवा अनावृष्टी झाली की प्राण्यामध्ये आकांत उसळतो. अर्थात् देवाच्या करणींने दुःखमिश्रित सुख निर्माण होते. संत निर्दोष सुख देतात. तेथे दुःखाची वार्ता नसते. त्यातल्या त्यात नारदासारखा अत्यंत कृपाळू आत्मसखा संत भेटल्यावर मग काय विचारावे ! तेथे आत्मनंदाची पेठ पिकते.

संतांचा हा महिमा सामान्य लोकांना कळत नाही. आत्म्याचा आनंद एकदा मिळाला की तो कधीही नाश पावत नाही. याला 'अच्युत-आत्मस्थिती' असे म्हणतात. आत्मानंदापासून कधीही बाजूला न सरणे असा या पदाचा अर्थ आहे. संताची अच्युत-आत्मस्थिती असते. **म्हणून संतांची आणि देवाची देखील बरोबरी होऊ शकत नाही.** कशी ती पाहा. देवाचा अवतार झाला म्हणजे भक्तांना आनंद होतो, पण दैत्यांना भय उत्पन्न होते. संतांचे ठिकाणी ही विषमता नाही. संत जसे देवांना तसेच दैत्यांना पण प्रिय असतात. दैत्यांचा विश्वास संतांवर असतो. उदा. रावणाने देव बंदीत टाकले होते. तोच रावण नारदांना एकांतात नेऊन त्यांचे चरण वंदी व आपल्या अंतःकरणातील गुप्त गोष्ट त्यांना सांगे. तेच नारद रामचेही मित्र होते. जरासंध कृष्णाचा वैरी खरा, पण नारदांचे जाणेयेणे त्याच्या घरी होते. आणि कृष्णावर तर नारदांचा जीव होताच. भगवंताचे नाव घेऊ द्यायचे नाही. हे हिरण्यकशिपूचे ब्रीद, पण त्याला देखील नारदांचे कीर्तन मनापासून आवडे. संतांच्या ठिकाणी मुळीसुद्धा भेदबुद्धी नसते त्यांचा हा परिणाम होय. देवांची बुद्धी लालचीला बळी पडते तशी संतांची पडत नाही. पुरुष जसा वळतो तशी त्याची छाया वळते. तसे देवांचे प्रिय केले की ते मोठे प्रसन्न होतात. नाहीतर उलटे विघ्न करतात. जे लोक यज्ञ करून देवांना तृप्त करतात त्यांना त्याप्रमाणे देव फळे देतात. जे त्यांना तृप्त करीत नाहीत त्यांच्या जीवनात देव विघ्ने निर्माण करतात. तात्पर्य, आपण जसे कर्म करावे तसे फळ देव देत असतात. इतर देवांचे जाऊच द्या, पण सर्वात मोठा देव जो परमात्मा तोसुद्धा पक्का लाचखाऊ आहे. जीव घेतल्यावाचून काही तो भेटत नाही. आपला जीव पणाला लावून त्यांचे भजन केले तर तो प्रसन्न होतो व निजांग देतो. पण असे जो करीत नाही त्याच्या घरी चुकूनसुद्धा तो जात नाही. संतांची बुद्धी अशी नसते. कृपेचे केवळ निधीच असल्याने ते दीनांवर खरोखर कृपा करतात. उदा. व्यास ज्ञानी होते व ध्रुव अज्ञानी होता. तरी व्यासांनी जो उपदेश केला तेव्हा हा दैत्यपुत्र आहे असा विचार त्यांनी केला नाही. वाल्याकोळी तर केवळ वाटमाऱ्या. त्याला भजन ठाऊक नाही, पूजन ठाऊक नाही, पण रामनामाचा उपदेश करून नारदांनी त्याला महाकवी बनवून सोडले. तात्पर्य, संत अच्युतात्म असतात. आत्मस्वरूपापासून ते कधीही च्युत न झाल्याने देवदेखील त्यांचा आज्ञाधारक असतो. ''अमक्याचा उद्धार कर'' असे संतांनी म्हटल्यास देव त्याचा उद्धार करतो. एरव्ही देव त्याला हातातसुद्धा धरीत नाही. संत म्हणजे दीन जनांना परमार्थाची दीक्षा देणारे गुरू. म्हणून ब्रह्मज्ञानाच्या बाबतीत ते अति उदार असतात.

## भागवतधर्माची प्रस्तावना

भागवतधर्म म्हणजे **भगवंताकडे जाण्याचा मार्ग होय.** या मार्गात दृश्याला मनाने बाजूस सारून अदृश्यामध्ये वाटचाल करावी लागते. पण दृश्याच्या हलकल्लोळात या मार्गाकडे जावे तसे लोकाचे लक्ष जात नाही. अर्थात् तो लुप्त होऊन जातो. काही काल लुप्त झालेला हा मार्ग कोणीतरी संत पुन्हापुन्हा उजळतो. म्हणून वसुदेवासारखा खरा जिज्ञासू श्रोता भेटला तर नारदांसारखा संताला अति आनंद होतो आणि त्याला किती सांगू असे होऊन जाते.

वसुदेवाने मोठ्या उत्कंठेने आणि निष्ठेने भागवतधर्माविषयी नारदांना प्रश्न विचारला. वसुदेव स्वतः अति पवित्र व उदार भाग्याचा होता यात शंका नाही. कारण ज्याच्या नामाने संत पावन होतात व जगाला वंद्य बनतात तो भगवान श्रीकृष्ण त्याच्या पोटी जन्मला. **वसुदेव या नावावरून तर श्रीकृष्णाला वासुदेव असे म्हणतात.** ज्याच्या नामांचे स्मरण केले असता माणूस अत्यंत पावन होतो, ज्याच्या गुणानुवादाने पुण्याई वाढते व ज्याच्या नामाने संसारबंधन तुटते त्यांचे स्मरण नारदांना होऊन त्यांचे प्रेम उफाळून वर आले. येथे अशी शंका येईल की, ''नारदांना भगवंताचे विस्मरण झाले होते आणि वसुदेवाच्या प्रश्नामुळे त्यांचे स्मरण झाले की काय ?'' ही शंका बरोबर नाही. अग्नीकुंडामध्ये अग्नी नेहमी असतोच. तो राखेने झाकलेला असतो इतकेच. त्यावर तूप पडले की तो भडकून प्रकट होतो. तसे मुक्तपुरुषाच्या हृदयात भगवंताचे प्रेम नेहमी असतेच. पण भक्तीने वा भावाने भरलेला प्रेमळ श्रोता भेटून त्याने प्रश्न विचारला असता मुक्ताच्या हृदयातील आत्मानंद उफाळून वर येतो. असेच नारदांचे झाले. भागवतधर्माच्या ठिकाणी वसुदेवाची मोठी निष्ठा होती. मुक्त असो की मुमुक्षु असो किंवा विषयी माणूस असो, या सर्वांना भागवतधर्म पूर्ण समाधान देणारा आहे. भागवतधर्माचे ज्ञान झाले तर सर्व जगाचा उद्धार होऊन जाईल. त्याच्या आचरणाने साधक उद्धरून जातील यात नवल नाही. महापापीदेखील त्याने पावन होऊन जातील. भागवतधर्माने कोण कसा तरून जाईल हे काय सांगावे ! कोणी त्याच्या नुसत्या श्रवणाने तरतील, कोणी पठणाने तरतील, कोणी त्यांचे मनपासून चिंतन करून संसारपाशातून मुक्त होतील. जेथे भागवतधर्माचे निरुपण चालते तेथील वक्त्याला व श्रोत्यांना पाहून काही लोक सद्भावाने आनंदभरित होतील आणि तेही तरून जातील. इतकेच काय, पण देवद्रोह करणारे दुरात्मे आणि विश्वद्रोह करणारे दुष्टात्मे तेही भागवतधर्माने तरून जातात हे नवल आहे. भागवतधर्म जर हृदयात बाळगला तर वाईट कर्म करणाऱ्यांच्या कर्मांचा नाश करून टाकतो, अधर्माने वागणाऱ्यांचा अधर्म नाहीसा करून टाकतो आणि दोघांनाही भगवंतपर्यंत नेऊन पोचवितो. जेथे भागवतधर्म अवतरतो त्या ठिकाणी कर्म, अकर्म, विकर्म, निंदा, द्वेष, क्रोध, अधर्म इत्यादी अविद्येचे नावदेखील उरत नाही.

ooo

# श्रीमद् भगवद् गीता श्रीकृष्णाची वाङ्मयमूर्ती

ह. भ. प. अ. दा. आठवले



— ❖ ❖ ❖ —

प्रपन्न पारिजाताय तोत्रवैत्रैकपाणये।
ज्ञानमुद्राय कृष्णाय गीतामृतदुहे नम :

**अशी मनोमन प्रार्थना करून गीतेला श्रीकृष्णाची वाङ्मयमूर्ती म्हणून वंदन केले जाते व मगच गीतेचा पाठ केला जातो, अशी एक परंपरा आहे. या प्रार्थनेवरून गीतेचे नेमके महात्म्य कळून येते. 'गीता'व 'भागवत' हे श्रीकृष्णाचे दोन प्रमुख ग्रंथ. भागवत श्रीकृष्णाचा आचार आहे तर 'गीता' श्रीकृष्णाचा विचार आहे. एक कृष्णाचे जीवनचरित्र आहे तर गीता श्रीकृष्णाचे तत्त्वज्ञान आहे. अशा या गीतेचा थोर चिंतक, तत्त्वज्ञ श्री. अनंतराव आठवले यांनी करून दिलेला परिचय -**

— ❖ ❖ ❖ —

गीतेचे स्वरूप काय? तत्त्वज्ञान काय? ती मूळ महाभारतातीलच आहे? का मागाहून कोणी ती महाभारतात घुसडली. ती श्रीकृष्णानेच सांगितली का कोणी संन्यासमार्गी पंडितांनी तिची रचना केली? अर्जुनाने उपस्थित केलेल्या शंकांना श्रीकृष्णांनी प्रामाणिकपणे उत्तरे दिली का त्याचे मूळ प्रश्न डावलून त्याला वेगळ्याच काही तत्त्वज्ञानाचा बोध केला? गीता ही महाभारतात जेथे आहे, तेथे ती योग्य आहे का? गीतेची रचना एका माणसाची नसून तिच्यात वेळोवेली निरनिराळ्या लोकांनी भर घातली आहे, का ती एकहाती आहे? महाभारताचा आणि गीतेचा रचनाकाळ एकच आहे की भिन्न? गीतेच्या सर्व श्लोकात मिळून आलेला विषय हा एकच आणि सुसंगत आहे की तेथे परस्पर विसंगत विषयाची खिचडी झालेली आहे?

गीतेसंबंधी असे कित्येक वाद आहेत. त्यातील काही पूर्वीपासून आहेत. काही अगदी नवीन विचारसरणीतून निर्माण झाले आहेत. गीतेविषयी प्रेम आणि आदर बाळगणारांच्यामध्येही मतभेद आहेत. आणि गीता ज्यांना मुळीच मान्य नाही तेही गीतेच्या स्वरूपाविषयी एका मताचे नाहीत.

या वादामध्ये खोल शिरून त्यावर सप्रमाण चर्चा करावयाचे ठरविले तर तेवढ्यासाठीही एक मोठा ग्रंथ लिहावा लागेल. पण गीतेसंबंधीचे वाद अगदी डावलूनही चालणार नाही. त्यातही ज्यामुळे गीतेच महत्त्व उणावेल अशा मतांचे निराकरण करणे काहीसे आवश्यक आहे. म्हणून त्यासंबंधीचे माझे मत थोड्या स्पष्टपणाने मांडतो.

वाद हे परमेश्वराचे रूप असल्याचे गीतेने सांगितले आहे. तेव्हा वाद हे मिटत नाहीत आणि जेव्हा ते केवळ शब्दांचा आधार देऊन बौद्धिक पातळीवर खेळले जातात, ज्याला प्रत्यक्ष काही करावयाचेच नसते त्यांचे वाद तर कधी मिटणे शक्यच नसते. ज्यांची जिज्ञासा प्रामाणिक नाही, ज्यांची बुद्धी पूर्वग्रहाने आधीच दूषीत झाली आहे. विपरीत संस्काराने जे दुराग्रही बनले आहेत, त्यांच्याशी केलेले वादही कधी निर्णयाला येऊ शकत नाहीत. कारण अशी मंडळी ऐकून घेण्याच्या मनःस्थितीतच नसतात. त्यांच्याच विचार पद्धतीप्रमाणे त्यांनी गृहित धरलेले मत कसे चुकीचे आहे, हे सिद्ध केले तरी ते स्वतःचे मत सोडीत नाहीत, उलट तर्कशुद्ध पद्धतीचा स्वीकार करणारालाच परंपरावादी, सनातनी, श्रद्धाळू इतकेच काय पण निर्बुद्ध आणि बुरसटलेल्या विचारांचा मानतात.

संपूर्ण गीता ही भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला युद्धाच्यावेळी केलेल्या बोधाचे यथावत् प्रामाणिक संपादन आहे. संपादक महर्षी व्यासांसारखे प्रज्ञावान पुरुष आहेत. सर्व महाभारताची रचनाच कोणी विचारतो आणि कोणी सांगतो अशी असल्यामुळे गीतेचे स्वरूपही एखाद्या निबंधासारखे वा प्रबंधासारखे नाही. ते संवादाच्या रूपांचे आहे. आणि हे संवाद सरमिसळ आहेत म्हणजे धृतराष्ट्र विचारतो, त्याला संजय उत्तर देतो, पण तो कोण काय बोलले हे ज्याच्या त्याच्या शब्दांत सांगतो. निबंधकार स्वतः सांगतो तेही अलिप्तपणे सांगत असतो, तशी रचना महाभारताची नाही. महाभारताची रचना ही संवादस्वरूपाची असली तरी वृत्तांत निवेदनाची आहे. त्यामुळे प्रत्यक्ष घटना घडतात तो अनुक्रम आणि घटनांचे निवेदन केले जाते तो अनुक्रम अगदी सारखाच असतो असे नाही. वर्णन पश्चात्कथनासारखे किंवा पूर्वदर्शनाच्या निवेदनसारखे आहे. म्हणून गीता महाभारतात आता ज्याठिकाणी आहे त्या ठिकाणी ती सुसंगत किंवा चपखल वाटत नाही हे म्हणणे योग्य नाही.


महाभारताच्या रचनेचे वैशिष्ट्य लक्षात यावे म्हणून गीता जेथे आली आहे, त्याच्या पूर्वीचे वर्णन कसे आहे ते सांगतो. भीष्मपर्वाच्या तेराव्या अध्यायाचा आरंभ वैशंपायनाच्या भाषणाने झाला आहे. वैशंपायन, धृतराष्ट्र आणि संजय काय बोलले ते जनमेजयाला सांगतो आहे. संजयाचे भाषण 'ज्या श्लोकाने आरंभते तो असा आहे, 'संजय धृतराष्ट्राला म्हणतो, ''महाराज, आपणास नमस्कार असो. मी संजय आलो आहे. आपले पितामह भीष्म मारले गेले आहेत.'' असे म्हणून संजय भीष्मांचा गुणगौरव करतो. त्यानंतर भीष्मांच्या मृत्यूमुळे धृतराष्ट्राने केलेल्या शोकाचे वर्णन आहे. ते धृतराष्ट्राच्या तोंडीच आहे. त्यात तो पितामह भीष्मांना मारून पांडव राज्य मिळविण्याची इच्छा करतात असा खेद व्यक्त करतो. त्यानंतर लगेच म्हणतो की, त्यांच्याकडे तरी काय दोष? तेही क्षात्रधर्माचाच अवलंब करताहेत.'' मग तो दुर्योधन-दुःशासन-शकुनी-कर्ण याना दोष देतो. पंधराव्या अध्यायाचा आरंभ संजयाच्या भाषणाने होतो. तो म्हणतो, 'एकट्या दुर्योधनाला दोष देऊन काय उपयोग? आपल्या दुर्वर्तनाने निर्माण झालेल्या परिणामाचे दोष दुसऱ्याच्या माथी मारण्यात काही अर्थ नाही. सर्व युद्ध कसेकसे घडले ते विस्ताराने सांग असा आदेश तुम्ही दिलात म्हणून जे मी प्रत्यक्ष पाहिले आणि जे मला व्यासांच्या कृपेने प्राप्त झालेल्या योगदृष्टीने दिसले ते सर्व तुम्हाला सांगतो.'' येथून पुढील दहा अध्याय सेनेची रचना, निरनिराळ्या प्रकारच्या व्यवस्था, युधिष्ठिर-कृष्ण-अर्जुन यांचे परस्पर बोलणे याचे वर्णन आहे. ते सर्व सेनेच्या मांडामांडीच्या स्वरूपाचे आहे. ही मांडामांड पूर्ण झाली, सेना व्यवस्थित एकमेकांसमोर उभी राहिली आणि मग पंचविसाव्या श्लोकात धृतराष्ट्र विचारतो की माझ्या मुलींनी आणि पांडवांनी युद्धभूमीवर काय केले ते सांग. हा गीतेचा पहिला अध्याय आहे. म्हणजे महाभारतातही गीता जेथे आली आहे, तेथे ती प्रत्यक्ष युद्धाला आरंभ झाल्याचे वर्णन येण्यापूर्वीच आलेली आहे. त्याहीपूर्वी धृतराष्ट्राने प्रश्न विचारला आहे. पण तो सेनेची रचना कुणी कशी केली आहे या संबंधीचा आहे. यामुळे **महाभारतात गीता जेथे आली आहे, तेथे ती असणे अयोग्य आहे,** असे म्हणणे उचित नाही.

अर्जुनाने सगळ्याच आप्तेष्टांचा उल्लेख केला असला, कौरवांनी केलेल्या पातकांची, त्यांच्या आततायी कृत्यांची पुरेपूर आठवण अर्जुनाला असली, तरी त्याला खरे दुःख आहे ते भीष्मद्रोणांशी कसा लढू या विचाराचे. अर्जुन अत्यंत सज्जन आहे, सरळ मनाचा आहे, भावना प्रधान आहे. वडिलांविषयी, गुरुजनांविषयी नितांत आदर बाळगणारा आहे म्हणूनच हा प्रश्न त्याला पडला आहे, असे हे प्रशंसनीय अनुकरणही सद्‌गुण त्याचे ठिकाणी नसते तर त्याला कसे लढू हा प्रश्न पडलाच नसता. त्याच्या अंतःकरणात जे ममत्व आहे त्यामुळे निर्माण झालेल्या मोहाने तो किंकर्तव्यमूढ झाला आहे. त्यामुळे **अर्जुनाला वाटलेला हा विषादसुद्धा त्याच्या मोठेपणाचा गौरवास्पद भाग आहे. म्हणून त्या विषादालाही परंपरेने अर्जुनविषादयोग हे नाव दिले आहे. गीतेत जे तत्त्वज्ञान सांगितले गेले आहे ते या ममत्वाच्या निरासासाठीच सांगितले गेले आहे.**

बहुतेक कोणताही कुशल शस्त्रवैद्य आपल्याच मुलावर वा निकटच्या आप्तावर गंभीर शस्त्रकर्म करण्याचा प्रसंग उद्‌भवला तर ते स्वतः करीत नाही. चांगला शस्त्रवैद्य म्हणून तो नावाजलेला असतो, त्या स्वरूपाची वा त्याहूनही अधिक अवघड असलेली कित्येक शस्त्रकर्मे त्याने यशस्वीपणे हाताळलेली असतात. पण तरीही तो स्वतःच्या मुलावर शस्त्रकर्म करीत नाही. म्हणून श्रीकृष्णाने अर्जुनाच्या या बोलण्याला तू प्रज्ञावाद करीत आहेस असे म्हणून उपहासिले आहे.

गीतेचे तत्त्वज्ञान कर्म मार्गी, भक्तीमार्गी का ज्ञानमार्गी यातील काही असले तरी ममत्व भावना त्या सर्वांच्याच आड येणारी आहे. ती कर्तव्यापासून खऱ्या अर्थाने विन्मुख करणारी आहे. कारण कर्तव्याचे स्वरूप सर्वदा एकाच प्रकारचे असते, अनुकूल असते असे नाही. गीतेच्या भाषेत ते कुशलही असते. आणि अकुशलही असते. कुशल असते तेव्हा त्याविषयी आसक्त होऊन चालत नाही. म्हणून गीतेचे तत्त्वज्ञान ममत्व निरासाच्यादृष्टीने आणि त्यासाठी अत्यंत उपयुक्त असलेल्या

द्वंद्वसहिष्णुत्वाच्या दृष्टीने ममत्वनिरास आणि द्वंदाविषयीची तटस्थता-अलिप्तता यांच्या-भोवती गुंफले गेले आहे. अर्थात मग ओघाने ममत्व का निर्माण होते, ते कसे नाहीसे करावे, ते सांगावे लागले. तसेच द्वंद्वाचे स्वरूप त्यांचे होणारे परिणाम याविषयीही विचार करावा लागला. आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या साधनेचेही वर्णन गीतेत आले आहे. गीता ही कुणी शब्दज्ञानी पंडिताने, काहीही काम न उरलेल्या सेवानिवृत्त वृद्धांसाठी सांगितलेली नसून योगेश्वर श्रीकृष्णाने अर्जुनासारख्या श्रेष्ठ धनुर्धरास, उत्साही वीरास ती सांगितली आहे. तिचे स्वरूप इतके श्रेष्ठ आहे की श्रीज्ञानेश्वर महाराजांसारख्या थोर महात्म्यांनी गीतेला 'भगवान श्रीकृष्णाची वाङ्ममूर्ती' असे म्हटले आहे. म्हणून श्रीशंकराचार्यांपासून लोकमान्य टिळकापर्यंतच्या थोर भाष्यकारांपैकी कुणीही गीतेतील कोणत्याही भागांना प्रक्षिप्त किंवा परस्परविसंगत म्हटलेले नाही. या सर्वच महात्म्यांची वृत्ती "अधिकार तैसा दावियला मार्ग" अशी लोककल्याणाची, जनहितसाधनाची असल्याने स्वतःच्या प्रवृत्तीला वा परिस्थितीला अनुसरून निरनिराळ्या विषयांनी प्राधान्य देऊन गीतेचे तत्त्वज्ञान त्यांनी प्रतिपादले आहे. ते परस्परविरोधी नाही तर योग्यतेला अनुसरून परस्परपूरक आहे. औषधे आणि उपचारपद्धती निरनिराळी असली तरी आरोग्य मात्र एकरूपच असते. तसेच गीतेच्या संबंधातही समजावे.



**जगन्नाथपुरीच्या मंदिरातील श्री जगन्नाथ, बलभद्र व सुभद्रा यांचे विग्रह व भक्त**

गीतेमध्ये अर्जुनाने उपस्थित केलेल्या प्रश्नाला श्रीकृष्णांनी उत्तरे दिली नाहीत, त्याचे प्रश्न डावलेले हे म्हणणे फारच चमत्कारिक आहे. कारण स्वतः अर्जुनच श्रीकृष्णाचा उपदेश ऐकल्यावर शेवटी म्हणाले की, **"कृष्णा तुझ्या प्रसादाने माझा मोह नाहीसा झाला आहे. मला ज्ञानाचे आकलन झाले आहे. आणि मी आता निःसंदेह झालो आहे. तू सांगितलेस त्याप्रमाणे आता मी वागेन.** श्रीकृष्ण कुणी विसरभोळा प्राध्यापक नाही किंवा अर्जुन, महाविद्यालयातील वर्षे ही जीवनाचा आनंद विलासीपणे उपभोगण्यासाठी असतात, असे समजणारा, श्रीमंत बापाने लाडावलेला, विद्येविषयी मुळीच आस्था नसलेला विद्यार्थीही नाही. **अर्जुनाने शेवटी जे उद्गारले आहे. त्यावरून त्याने विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे त्याला मिळाली आहेत हे स्पष्ट होते. तेव्हा आपल्याला अर्जुनापेक्षा अधिक कळते असे गृहित धरून श्रीकृष्णाने अर्जुनाचे प्रश्न डावलले हे म्हणणे योग्य नाही.**

युद्धामध्ये संहार होतो आणि त्या संहाराचेही काही परिणाम असतात; पण त्यांची भीषणता सर्वदा तेवढीच व सारखीच असते असे नाही. हेही पुन्हा काहीसे शस्त्रकर्मासारखेच आहे. काही शस्त्रकर्मानंतर पंगुत्व येते, दौर्बल्य येते. एखादा अवयव तोडून टाकावा लागतो. त्यामुळे मनुष्य जिवंत राहिला तरी त्याची कार्यक्षमता उणावते. त्याला पूर्णपणे परावलंबी जीवन जगावे लागेल इतकीही ती घटते. तर काही वेळा शस्त्रकर्माने त्यावेळेपुरता पुष्कळ त्रास सोसावा लागला तरी नंतर माणसाचे आरोग्य पूर्वीपेक्षा सुधारते. प्रकृती ठणठणीत होते.

महाभारतीय युद्धात भीषण संहार झाला हे खरे. पण त्यानंतर छत्तीस वर्षांपर्यंत पांडवांनी रामराज्य केले. शिकंदरच्या आक्रमणापर्यंत कोणतीही आपत्ती भारतावर ओढवली नाही. हा काळ निदान अडीच हजार वर्षांपेक्षा अधिक आहे. शिकंदरच्या आक्रमणानेही भारतवर्षाची फार मोठी हानी झाली असे म्हणता येणार नाही. त्याला भारताच्या सीमेच्या थोडे अलिकडे येताच परत जावे लागले. आणि त्यानंतरही झालेल्या सर्व आक्रमणाला जवळजवळ एक सहस्त्रवर्षपर्यंत भारताने यशस्वीपणे तोंड दिले. आक्रमकांना परतवून तरी टाकले वा पचवून तरी टाकले. भारताच्या दुर्दैवाचा खरा आरंभ शालिवाहन शकाच्या सातव्या शतकापासून झाला आहे. म्हणजे महाभारत युद्धाच्या नंतर साडेतीन हजार वर्षांनी दैन्य आपल्या कपाळी आले. **तेव्हा महाभारत युद्धाने भारतावर दुष्परिणाम घडविले या म्हणण्यात काही अर्थ नाही.** सर्व विद्या-कला यांचा परिपोष भारतात चांगला झाला. घरोघर सोन्याचा धूर निघत होता, तूप-मधाचे पाट वहात होते. कोणतेही सामाजिक संघर्ष निर्माण झालेले नव्हते. भारताचे वैभव आणि ऐश्वर्य पाहून बाहेरून आलेले प्रवासी, आश्चर्यचकित होत होते. सर्वदृष्टीने भारत प्रगत होता, उन्नत होता. वैभवाच्या शिखरावर विराजमान होता. विनाशाची बीजे रोवली गेली ती बुद्धकाळानंतर.

○○○

# होता पहा माझा गुरू। मोठा अवलिया कृपासगरू ॥

**- श्री साईबाबा**

(श्री साईबाबांचे गुरू उपदेशाबद्दलचे अमृतविचार )

— ❖ ❖ ❖ —

**एक साईभक्त देशमुखबाई आपणास साईबाबांनी गुरूउपदेशात्मक कानमंत्र द्यावा म्हणून धरणे धरून बसली. तेव्हा श्री साईबाबांनी मी कानमंत्र देणारा गुरू नाही असे त्या बाईस स्पष्ट सांगून त्या बाईस आपल्या अवलिया गुरूबद्दल साद्यंत हकीकत सांगितली. बाबांचे आपल्या गुरूबद्दलचे हे अमृतविचार श्री साईसच्चरित पोथीच्या अध्याय १९ मध्ये हेमाडपंतानी शब्दबध्द केलेले आहेत ते अमृतविचार पुढील प्रमाणे -**

— ❖ ❖ ❖ —

होता पहा माझा गुरू । मोठा अवलिया कृपासागरू ।
थकलों तयाची सेवा करकरूं । कानमंतरू देईना ॥
माझ्याही मनीं प्रबळ आस । कधीं न सोडावी तयाची कांस ।
तया मुखेंच घ्यावें मंत्रास । दीर्घ सायास करूनि ॥
आरंभीं तयानें मज मुंडिलें । पैसे मज दोनचि याचिले ।
ते मीं तात्काळ देऊनि टाकिले । बहु मीं प्रर्थिलें मंत्राक्षर ॥
माझा गुरू पूर्णकाम । दोन पैशांचें काय काम ।
कैसें म्हणावें त्या निष्काम । शिष्यांसी दाम मागे जो ॥
ऐसी न शंका येवो मना । व्यावहारिक पैशाची न त्या कामना
। ही तों नाहीं तयाची कल्पना । कर्तव्य कांचना काय त्या ॥
**निष्ठा** आणि **सबूरी** दोन । हेच ते पैसे, नव्हते आन । म्यां ते
तेव्हांच टाकिले देऊन । तेणें मज प्रसन्न गुरूमाय ॥
धैर्य तीच गे बाई सबूरी । सांडूं नको तिजला दूरी ।
पडतां केव्हांही जडभारी । हीच परपारीं नेईल ॥
पुरूषांचे पौरूष ती ही सबुरी । पाप ताप दैन्यता निवारी ।
युक्तिप्रयुक्तीं आपत्ति बारी । बाजूस सारी भय भीती ॥
सबुरीवरी यशाचा वांटा । विपत्ती पळवी बारा वाटा ।
येथ अविचाराचा कांटा । नाहीं ठावुका कोणाही ॥
सबुरी सन्दुणांची खाणी । सद्विचाररायाची हे राणी ।
निष्ठा आणि ही सख्या बहिणी । जीव प्राण दोघींसी ॥
सबुरीवीण मनुष्यप्राणी । स्थिति तयाची दैन्यवाणी ।
पंडित असो कां मोठा सद्गुणी । व्यर्थ जिणें हिजवीण ॥
गुरू जरी महा प्रबळ । अपेक्षी शिष्यप्रज्ञाच केवळ ।
गुरूपदीं निष्ठा सबळ । धैर्यबळ सबूरी ॥
जैसा दगड आणि मणी । उजळती दोन्ही घासितां सहाणीं ।
परी दगड राहे दगडपणीं । मणी तो मणी तेजाळ ॥
एकचि संस्कार दोघां उजळणी ।
दगड चढेल काय मण्याचें पाणी ।
घडेल मण्याची सतेज हिरकणी ।
दगड निजगुणीं तुळतुळीत ॥
बारा वर्षे पायीं वसवटा । केला गुरूनें लहानाचा मोठा ।
अन्नवस्त्रासी नव्हता तोटा । प्रेम पोटांत अनिवार ॥
भक्तिप्रेमाचा केवळ पुतळा ।
जयास शिष्याचा खरा जिव्हाळा ।
माझ्या गुरूसम गुरू विरळा । सुखसोहळा न वर्णवे ॥
काय त्या प्रेमाचे करावें वर्णन । मुख पाहतां ध्यानस्थ नयन।
आम्ही उभयतां आनंदधन । अन्यावलोकन नेणें मी ॥
प्रेमें गुरूमुखावलोकन । करावें म्यां रात्रंदिन । नाहीं मज भूक
ना तहान । गुरूवीण मन अस्वस्थ ॥
तयावीण नाहीं ध्यान । तयावीण न लक्ष्य आन ।
तोच एक नित्य अनुसंधान । नवलविंदान गुरूचें ॥
हीच माझ्या गुरूची अपेक्षा । कांहीं न इच्छी तो यापेक्षां ।
केली न माझी केव्हांही उपेक्षा । संकटीं रक्षा सदैव ॥
कधीं मज वास पायांपाशीं । कधीं समुद्र-परपारासी ।
परी न अंतरलों संगमसुखासी । कृपादृष्टीसीं सांभाळी ॥
कासवी जैसी आपुले पोरां । घालिते निजदृष्टीचा चारा ।
तैसीच माझे गुरूची तऱ्हा । दृष्टीनें लेंकरा सांभाळी ॥
आई या मशिदींत बैसून । सांगतों तें तूं मानीं प्रमाण ।
गुरूनें न फुंकले माझेच कान । तुझे मी कैसेन फुंकरू ॥
कासवीची प्रेमदृष्टी । तेणेंच पोरांसी सुखसंतुष्टी ।
आई उगीच किमर्थ कष्टी । उपदेशगोष्टी नेणें मी ॥
कासवी नदीचे एके तटीं। पोरें पैल वाळवंटीं ।
पालन पोषण दृष्टादृष्टी । व्यर्थ खटपटी मंत्राच्या ॥
तरी तूं जा अन्न खाईं । नको हा घालूं जीव अपायीं ।
एक मजकडे लक्ष दई । परमार्थ येईल हातास ॥
तूं मजकडे अनन्य पाहीं । पाहीन तुजकडे तैसाच मीही ।
माझ्या गुरून अन्य कांहीं । शिकविलें नाहींच मजलागीं ॥
नलगे साधनसंपन्नता । नलगे षट्शास्त्रचातुर्यता ।
एक विश्वास असावा पुरता । कर्ता हर्ता गुरू ऐसा ॥
म्हणूनि गुरूचि थोर महती । गुरू हरिहरब्रम्हमूर्ति ।
जो कोण जाणे तयाची गति । तो एक त्रिजगतीं धन्य गा ॥